

आदिकवी

श्री वाल्मिकी

विरचित

मूळ संस्कृत


# रामायण

## २

मराठी श्लोक

श्री. श्याम

कुलकर्णी



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# -श्रीवाल्मिकी रामायण-

## खंड २

## मूळ संस्कृत व मराठी श्लोकमय अनुवाद-श्री.श्याम कुलकर्णी

# -श्रीवाल्मिकी रामायण – खंड २

## मराठी समश्लोकी अनुवाद : श्री. श्याम कुलकर्णी

पत्ता : द्वाराश्री. जयवंत कुलकर्णी, ''गन्धार'' फ़्लॅटक्र. ५/४
आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे४११०२९
संपर्क – व्हॉट्सऍपक्र. ९७६५४५६५८१
Email : sgk६६४२@gmail. com

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act १९५७ provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : ७ डिसेंबर २०२२ (दत्तजयंती शके १९४४)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्री श्याम कुलकर्णी (काव्यानुवादक)



यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E. १९७५ अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त. लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित

# प्रास्ताविक

ग्रन्थ पूर्ण होण्यापूर्वीच प्रस्तावना लिहिणे हा मर्यादातिभङ्ग आहे आणि 24,000 श्लोकांच्या “वाल्मीकीय रामायण” या ग्रन्थातील 350-400 श्लोकांचे रूपान्तरण हे तर मूळ ग्रन्थाचा साठावा भाग पूर्ण करण्यासारखे आहे. त्यामुळे हे दोन शब्द केवळ ईसाहित्य चे श्री. सुनिळ सामन्त यांचे ऋण मान्य करण्यासाठी लिहीत आहे. केवळ त्यांच्या आग्रहामुळेच मी हे मोठे काम अंगावर घेतले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

या ग्रन्थास डॉ. रविन थत्ते यांच्यासारख्या महान व्यक्तीचा आशीर्वाद लाभणे हे माझे महद्भाग्य!

हे काम माझ्या हातून पूर्ण होण्याचे भाग्य मला लाभो येवढीच ईश्वरचरणी प्रार्थना !

श्याम कुलकर्णी



Dr. Ravin Thatte

श्याम कुलकर्णी ह्यांची आणि माझी ओळख खरे तर माझ्या व्यवसायामुळे (प्लास्टिक सर्जन \ सुघटन शल्य) झाली होती ह्याची त्यांनी मला हल्लीच ह्या त्यांच्या प्रकल्पाबद्दल चर्चा करतांना करून दिली . पुढे मी ज्ञानेश्वरीवर लिहिण्यास सुरुवात केल्या नंतर देखील आमची भेट झाली होती हे मात्र आठवते. हा रामायणावरचा त्यांचा प्रयत्न \प्रकल्प बघून आणि वाचून मी थक्क झालो आहे . केवढे प्रचंड काम आहे हे! ह्या पूर्वी त्यांनी भगवत गीतेवर, रामरक्षेवर आणि मेघदूतावर अशीच समश्लोकी लिहिण्याची कामगिरी केली आहे हे कळल्यावर तर मी अवाक झालो . असला माणूस माझ्या परिचयाचा

आहे हे कळून धन्य वाटले. त्यांनी हे सगळे काम "मी स्वानंदासाठी करत आहे" असे लिहिले आहे . सगळ्या मोठ्या कृती ह्या स्वानंदातूनच निर्माण होतात हे फार जुने सत्य इथे परत उजळले आहे. ही हल्लीची समश्लोकी , रामायणाची, आताच वाचली. ती फार छान उतरली आहे आणि वाचतांना खिळवून ठेवते. प्रकल्प अजून पूर्ण व्हायचा आहे तो नक्कीच पूर्ण होईल अशी खात्री आहे आणि त्यासाठी माझ्या सारख्या अनेकांच्या शुभेच्छा पोहोचवण्याचे काम मी आनंदाने करतो आहे.

Dr. रविन थत्ते

**(प्लॅस्टिक सर्जन व संस्कृत पंडित. अध्यात्मावर ११ पुस्तके प्रकाशित)**

# श्रीवाल्मिकी रामायण- १ (सर्ग १ ते २१) वाचण्यासाठी खालील मुखपृष्ठावर क्लिक करावे



# - अथ श्रीवाल्मिकी रामायण- २

# बालकाण्ड सर्ग २२

तथा वसिष्ठे ब्रुवति राजा दशरथ: स्वयम् ।
प्रहृष्टवदनो राममाजुहाव सलक्ष्मणम् ॥1॥

ऐकुनी वसिष्ठ वचना राजा दशरथ स्वत:।
आनंदाने रामासपाठवी लक्ष्मणासवे ॥1॥

कृतस्वस्त्ययनं मात्रा पित्रा दशरथेन च ।
पुरोधसा वसिष्ठेन मङ्गलैरभिमन्त्रितम् ॥2॥

इच्छिती मंगल त्यांचे माता पिता दशरथ ।
मंगल मंत्रे करिती वसिष्ठ अभिमन्त्रित ॥2॥

स पुत्रं मूर्ध्न्युपाघ्राय राजा दशरथस्तदा ।
ददौ कुशिकपुत्राय सुप्रीतेनान्तरात्मदा ॥3॥

करुनीया अवघ्राण दशरथ पुत्रमस्तकां ।
आनन्दित मने त्यांना देइ विश्वामित्रांकडे ॥3॥

ततौ वायु: सुखस्पर्शो नीरजस्को ववौ तदा ।
विश्वामित्रगतं रामं दृष्ट्वा राजीवलोचनम् ॥4॥

विश्वामित्रासवे रामा पाहुनी वायु निर्मल ।
सुखदायी करी स्पर्श तेव्हां राजीवलोचना ॥४॥

पुष्पवृष्टिर्महत्यासीत देवदुंदुभिनि:स्वनै|
शंखदुंदुभिनिर्घोष: प्रयाते तु महात्मनि ।5॥

पुष्पवृष्टि तशी झाली देवदुंदुभिच्या सवे ।
महापुरुष निघता ते शंख नादहि होतसे ॥5॥

विश्वामित्रो ययावग्रे ततो रामो महायशा: ।
काकपक्षधरो धन्वी तं च सौमित्रिरन्वगात ॥6॥

विश्वामित्र पुढे राम यशवन्त अनुसरे ।
त्यास लक्ष्मण अनुसारी धनुष्यासह सुकेशि जो ॥6॥

कलापिनौ धनुष्पाणी शोभयानौ दिशो दश ।
विश्वामित्रं महात्मानं त्रिशीर्षाविव पन्नगौ ॥7॥

धनुर्बाण धरल्याने त्रिशीर्ष पन्नगापरी
दिशा उजळित ते दोघे विश्वामित्राबरोबरी ॥7॥

अनुजन्मतुक्षुद्रौ पितामहमिवाश्विनौ ।
अनुयातौ श्रिया दीप्तौ शोभवन्तवनिन्दितौ ॥8॥

ब्रह्मदेवासवे जैसे अश्विनीकुमारद्वय
तसे निर्दोष ते दोघे विश्वामित्रांसह शोभती ॥8॥

तदा कुशिकपुत्रं तु धनुष्पाणी स्वलंकृतौ ।
बद्धगोधाङ्गुलित्राणौ खड्गवन्तौ महाद्युती ॥9॥
कुमारौ चारुवपुषौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ।
अनुयातौ श्रिया दीप्तौ शोभयेतामनिन्दितौ ॥10॥

धनुष्यासह गोचर्मअंगुलिस्तान धारण ।
दैदिप्यमान कांतिने कुमारद्वय शोभती ॥9॥

अनिंद्य स्वयंप्रकाशी शिवाला जणु षडानन ।
कुशिकपुत्रा ते दोघे शोभवीति स्वदीप्तीने ॥10॥

स्थाणुं देवमिवाचिन्त्यं कुमारविव पावकी ।
अध्यर्धयोजनं गत्वा सरय्या दक्षीणे तटे ॥11॥

देवतुल्य असे दोघे कुमार अर्ध योजन ।
चालुनी अंतर तीरी शरयूच्या दक्षिणेकडे ॥11॥

रामेति मधुरां वाणीं विश्वामित्रोऽभ्यभाषत ।
गृहाण वत्स सलिलं मा भूत्कालस्य पर्यय: ॥12॥

विश्वामित्र रामास म्हणती मधुर स्वरे ।
जले करि आचमना योग्य काल असेच हा ॥12॥

मन्त्रग्रामं गृहाण त्वं बलामतिबलां तथा।
न श्रमो न ज्वरो वा ते न रूपस्य विपर्यय: ॥13॥

बला अतिबला सिद्ध मन्त्र ग्रहण ते करी ।
ज्यामुळे श्रम वा ताप न होती रूपही टिके ॥13॥

न च सुप्तं प्रमत्तं वा घर्षयिष्यन्ति नैऋता: ।
न बाह्वो: सदृशो वीर्ये पृथिव्यामस्ति कश्चन ॥14॥

असता निद्रिस्त किंवा सावध नसता तुम्ही ।
तुम्हा त्रास न देतील राक्षस येथ येउनी ।
तुमच्यासम बाहूत बळ कोणा न भूवरी ॥14॥

त्रिशु लोकेषु वा राम न भवेद्सदृशस्तव ।
बलामतिबलां चैव पठतस्तात राघव ।
न सौभाग्ये न दाक्षिण्ये न ज्ञाने बुद्धिनिश्चये ॥15॥

तिन्ही लोकात हे राम न तुझ्यासम कोणिही ।
सौभाग्ये दाक्षिण्ये किंवा ज्ञान बुद्धिबलातही ।
पठण करी त्यासाठी बला प्रतिबलास तू ॥15॥

नोत्तरे प्रतिवक्तव्ये समो लोके तवानघ ।
एतद्विद्याद्वये लब्धे न भवेत सदृशस्तव ॥16॥

प्रत्युत्तर देण्यासाठी बक्तव्य करण्यातही ।
होता दोन विद्या प्राप्त कोणी न तुजसम होइल ॥16॥

बला चातिबला चैव पठतस्तातराघव ।
विद्याद्वयमधीयाने यशश्चाथ भवेद्भुवि ॥17॥

बला अतिबला यांचा कर अभ्यास राघव ।
शिकुनी दोन या विद्या लाभेल यश सर्वथा ॥17॥

क्षुत्पिपासे न ते राम भविष्यते नरोत्तम:।
बलामतिबलां चैव पठतस्तात राघव ॥18॥

क्षुधा पिपासा यांचा ना त्रास कधि तुज होइल ।
बला अतिबला यांच्या अभ्यासे राघवा तुला ॥18॥

पितामहसुते ह्येते विद्ये तेज:समन्विते ।
प्रदातुं तव काकुत्स्थ सदृशस्त्वं हि पार्थिव ॥19॥

तेजयुक्त अश्या कन्या दोन ब्रह्मदेवाच्या ।
काकुत्स्थकुल उत्पन्न शिकण्या योग्य तूचही ॥19॥

कामं बहुगुणा: सर्वे त्वय्येते नात्र संशय:।
तपसा संभृते चैते बहुरूपे भविष्यत: ॥20॥

स्वीकारण्यास ह्या विद्या तुझ्यात गुण योग्य ते ।
तपे मिळविशीतेव्हां फलप्रद बहु होतिल ॥20॥

ततो रामो जलं स्पृष्ट्वा प्रहृष्टवदन: शुचि:।
प्रतिजग्राह ते विद्ये महर्षेर्भावितात्मन: ॥21॥

राम स्पर्शी जला शुद्ध होता आनंदित मुखे ।
महर्षींपासुनी विद्या करी ग्रहण तेधवा ॥21॥

विद्यासमुदितो राम: शुशुभे भीमविक्रम:।
सहस्त्ररश्मिर्भगवान्छरदीव दिवाकर:॥22॥

जणु सहस्त्ररश्मि सूर्य जैसा शरद ऋतूतिल ।
विद्याग्रहणे राम पराक्रमि शोभु लागला ॥22॥

गुरुकार्याणि सर्वाणि नियुज्य कुशिकात्मजः।
ऊषुस्त्वां रजनीं तत्र सरय्यां ससुखं त्रयः ॥23॥

गुरूसंबंधि कर्तव्ये सांगे त्यां कुशिकात्मज ।
रात्र ती शरयूतीरी घालवीती तिघे सुखे ॥23॥

दशरथनृपसूनुसत्तमाभ्यां तृणशयनेऽनुचिते तदोषिताभ्यां ।
कुशिकसुतवचोऽनुलालिताभ्यां सुखमिव सा विबभौ विभावरी ॥24॥

दशरथ पुत्र सुखे घालविती प्रथमच त्या तृणशय्येवर रात्र ।
विश्वामित्र मुनी संभाषण ऐकत असता आनंदित ते ॥24॥

# इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे द्वाविंशः सर्गः ॥22॥

# बालकाण्ड सर्ग 23

प्रभातायां तु शर्वर्यां विश्वामित्रो महामुनि: ।
अभ्यभाषत काकुत्स्थो शयानौ पर्णसंस्तरे ॥1॥
कौसल्या सुप्रजा राम पूर्वा संध्या प्रवर्तते ।
उत्तिष्ठ नरशार्दूल कर्तव्यं दैवमाह्निकं ॥2॥

उजाडता विश्वामित्र निद्रिस्त पर्णशय्येवरी ।
सुप्त ककुत्स्थकुलजां रामलक्ष्मणा बोलती ॥1॥

सुपुत्रा कौसल्येच्या रामा झाली पहाट ही ।
ऊठ हे नरशार्दूला प्रात:संध्या काल हा ॥2॥

तस्यर्षे परमोदारं वच: श्रुत्वा नरोत्तमौ ।
स्नात्वा कृतोदकौ वीरौ जेपतु: परमं जपम् ॥3॥

ऋषींच्या परमोदार वचनास त्या ऐकुनी ।
स्नानोत्तर देउनी अर्घ्य जपती गायत्रि मंत्र ते ॥3॥

कृताह्निकौ महावीर्यौ विश्वामित्रम् तपोधनम् ।
अभिवाद्यातिसंदृष्टौ गमनायाभितस्थतु: ॥4॥

आह्निकानंतर दोघे हर्षे मुनींस वंदुनी ।
मार्ग आक्रमण्यासाठी उभे संमुख राहती ॥4॥

तौ प्रयान्तौ महावीर्यौ दिव्यां त्रिपथगां नदीम् ।
ददृशाते ततस्तत्र सरय्या: संगमे शुभे ॥5॥
बहुवर्षसहस्राणि तप्यतां परमं तप: ।
तत्राश्रमपदं पुण्यमृषीणां भावितात्मनाम् ॥6॥

पाहती ते महावीर दिव्य त्रिपथगा नदी ।
शरयूस मिळे तेथे शुभ संगम पाहती ॥5॥

तप करती उत्कृष्ट सहस्त्रावधि वर्षेहि ।
आश्रमस्थान ते पुण्य ऋषींचे उभयां दिसे ॥6॥

तं दृष्ट्वा परमप्रीतौ राघवौ पुण्यमाश्रमम् ।
ऊचतुस्तं महात्मानं विश्वामित्रमिदं वच: ॥7॥
कस्यायमाश्रम: पुण्य: को न्वस्मिन्वसते पुमान् ।
भगवच्छ्रोतुमिच्छाव: परं कौतूहलं हि नौ ॥8॥

आश्रमा पाहुनी दोघे राघव अतिआदरे ।
महात्मा विश्वामित्रां विचारू लागले असे ॥7॥

असे आश्रम कोणाचा येथे कोण रहातसे ।
कुतूहल असे आम्हा इच्छितो जाणण्या आम्ही ॥8॥

तयोस्तद्वचनं श्रुत्वा प्रहस्य मुनिपुङ्गवः।
अब्रवीच्छ्रूयतां राम यस्यास्यं पूर्व आश्रमः ॥9॥

ऐकुनी त्यांच्या वचना हसून मुनिवर्य ते ।
रामास सांगती पूर्वी कोणाचा आश्रम असे ॥9॥

कन्दर्पो मूर्तिमानासीत्काम इत्युचते बुधैः ।
तपस्यन्तमिहं स्थाणुं नियमेन समाहितम ॥10॥

कृतोद्वाहं तु देवेशं गच्छन्तं समरुद्गणम् ।
घर्षयामास दुर्बुद्धा हुंकृतश्च महात्मना ॥11॥

त्यावेळी आश्रमामध्ये तप एकाग्र होउनी ॥10॥
होते करित देवेश त्यांच्या रुद्रगणांसवे ।
कन्दर्प मूर्तिमान् पूर्वी ज्ञानी त्या काम बोलती
दुर्बुद्धि होउनि त्याना विकारवश तो करी ॥11॥

अवध्यातश्च रुद्रेण चक्षुषा रघुनन्दन ।
व्यशीर्यन्त शरीरात्स्वात्सर्वगात्राणि दुर्मते: ॥12॥

क्षुब्ध होउनि रुद्राने पाहता वक्रदृष्टीने ।
दुर्मतिची गात्रे सर्व विच्छिन्न होती राघवा ॥12॥

तत्र गात्रं हतं तस्य निर्दग्धस्य महात्मन:।
अशरीर: कृत: काम: क्रोधाद्देवेश्वरेण ह ॥13

तुटुनी अवयव त्याचे क्रोधाग्नीत जळूनिय।
असा अशरीरी काम क्रोधे देवेश्वरे कृत ॥13॥

अनङ्ग इति विख्यातस्तदाप्रभृति राघव ।
सचाङ्ग्विषय: श्रीमान्त्राङ्गं स मुमोह च ॥14॥

तेव्हापासुनि तो ज्ञात अनङ्ग म्हणुनी असे ।
जेथे घडे हे सर्व अङ्ग देश प्रसिद्ध तो ॥14॥

तस्यायमाश्रम: पुण्यस्तस्येमे मुनय: पुरा ।
शिष्या धर्मपरा वीरा तेषां पाप न विद्यते ॥15॥

शिवाचा आश्रम त्याच मुनी त्याचेच पूर्विचे ।
धर्मनिष्ठ असे शिष्य पाप त्यांस मुळी नसे ॥15॥

इहाय रजनीं राम वसेम शुभदर्शन ।
पुण्ययो: सरितोर्मध्ये श्वस्तरिष्यामहे वयम ॥16॥

शुभदर्शन हे रामा रात्र येथेच काढुनी ।
पुण्य या सरितांमध्ये तरूनी जाउ पलिकडे ॥16॥

अभिगच्छामहे सर्वे शुचय: पुण्यमाश्रमम् ।
इह स: परोऽस्माकं सुखं वत्स्यामहे निशाम् ॥17॥
स्नाताश्च कृतजप्याश्च हुतहव्या नरोत्तमम् ॥18॥

शूचिर्भूत होउनी जाऊ या पुण्य आश्रमामध्ये ।
वास्तव्य आपले येथे सुखाचे रात्रि होइल ॥17॥
करुनी स्नान जप होम रात्र येथेच काढुया ॥18॥

तेषां संवदतां तत्र तपोदीर्वेण चक्षुषा ।
विज्ञाय परमप्रीता मुनयो हर्षमागमन् ॥19॥
अर्घ्यं पाद्यं तथातिथ्यं निवेद्य कुशिकात्मजे ।
रामलक्ष्मणयो: पश्चादकुर्वन्नतिथिक्रियाम् ॥20॥

चालता संवाद त्यांचा जाणुनीया तपोबले ।
त्यांच्या आगमना हर्ष मुनींना जाहला असे ॥१९॥
अर्पूनिया अर्घ्य पाद्य स्वागत करति कौशिका ।
रामा,लक्ष्मणालाहि तसेच करिति नंतर ॥20॥

सत्कारं समनुप्राप्य कथाभिरभिरंजयन्।
तथार्हमजपन्संध्यामृषयस्ते समाहिता: ॥21॥

सत्काराानन्तर करती मनोरंजन कथांसवे।
नंतर स्वस्थ चित्ताने करिती संध्या वंदन ॥21॥

तत्रवासिभिरानीता मुनिभि: सुव्रतै: सह।
न्यवसत्स सुखं तत्र कामाश्रमपदे तथा ॥22॥

आणति मुनि तेथील व्रतस्थ ऋषिच्या सवे।
शयनस्थानि ते सर्व सुखें राहति आश्रमी ॥22॥

कथाभिरभिरामाभिरभिरामौ नृपात्मजौ ।
रमयामास धर्मात्मा कौशिको मुनिपुङ्गव : ॥23॥

रूपसुन्दर दोघांना कथा सांगून रमविती ।
धर्मात्मा विश्वामित्र मुनिश्रेष्ठ तदा सुखे ॥23॥

**इत्यर्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिय आदिकाव्ये बालकाण्डे त्रयोविंश: सर्ग: ॥23॥**

# बालकाण्ड सर्ग 24

ततः प्रभाते विमले कृतानिकमरिन्दमौ ।
विश्वामित्रं पुरस्कृत्य नद्यास्तीरमुपागतौ ॥1॥

सुप्रभाती स्नानसंध्या आटोपून मुनींसह ।
बन्धुद्वय शत्रुनाशी नदीतीरी उपस्थित॥1॥

ते च सर्वे महात्मानो मुनयः संशितव्रताः ।
उपस्थाप्य शुभां नावं विश्वामित्रमथाब्रुवन् ॥2॥

मागवोनि सुंदर नौका मुनी सर्व व्रतस्थित ।
विश्वामित्रास महात्मे ते ऐसे वचन बोलती ॥2॥

आरोहतु भवान्नावं राजपुत्रपुरस्कृत: ।
अरिष्टं गच्छ पन्थानं माभूत्कालस्य पर्यय: ॥3॥

राजापुत्रांस घेऊनी नौकेत या आरूढ व्हा ।
विलंब न करा मार्गा लागा निर्विघ्न होउनी ॥3॥

विश्वामित्रस्थथेत्युक्त्वा तानृषीन्प्रतिपूज्य च ।
ततार सहितस्ताभ्यां सरितं सागरंगमाम् ॥4॥

मानुनीया तया बोलां ऋषींचा मान राखुनी ।
गंगा पार करू जाती समुद्राप्रति जात जी ॥4॥

तत्र शुश्राव वै शब्दं तोयसंरम्भवर्धितम् ।
मध्यभागस्य तोयस्य तस्य शब्दस्य निश्चयम् ॥5॥

मध्यात नदिच्च्या येता रामाच्च्या ध्वनि कानि ये ।
वृद्धिंगत जलक्षोभे वाटे त्या जाहला असे ॥5॥

ज्ञातुकामो महातेजा: सह रामा कनीयसा ।
अथ राम: सरिन्मध्ये पप्रच्छ मुनिपुङ्गवम् ॥6॥

लक्ष्मणासह रामाला कसला ध्वनि तो असे ।
जाणुनी घ्यायची इच्छा महातेजा असे तया
म्हणुनी सरितामध्ये मुनींना हे विचारीतसे ॥6॥

वारिणो भिद्यमानस्य किमर्थं तुमुलो ध्वनिः ।
राघवस्य वचः श्रुत्वा कौतूहलसमन्वितम् ॥7॥

कश्यामुळे ध्वनि हा ऐसा प्रचंड उद्भवे जली।
कुतूहल मिश्रित बोल रामाचे ऐकुनी असे ॥7॥

कथयामास धर्मात्मा तस्य शब्दस्य निश्चयं ।
कैलासपर्वते राम मनसा निर्मितं परम् ।
ब्रह्मणा नरशार्दूल तेनेदं मानसः सरः ॥8॥

शब्दाचे कारण त्या धर्मात्मा सांगती तयां ।
कैलासपर्वते ब्रह्मा निर्मी रम्य सरोवर ।
मनाने निर्मिले त्यानी म्हणून मानस जाणती ॥8॥

तस्मात्सुस्राव सरसः सायोध्यामुपगूहते ।
सरःप्रवृत्ता सरयूः पुण्या ब्रह्मसरश्च्युता ॥9॥

निघे त्यातून नदी जी अयोध्ये समीप वाहते ।
सरोवरातुन उत्पन्न सरयू ख्यात त्यामुळे ॥9॥

तस्यायमतुल: शब्दो जान्हवीमभिवर्तते ।
वारिसंक्षोभजो राम प्रणामं नियत: कुरु ॥10॥

तिचा अतुल हा नाद मिळे गंगाध्वनीसवे ।
नाद हा म्हणुनी रामा प्रणाम करि तू तिला ॥10॥

ताभ्यां तु तावुभौ कृत्वा प्रणामतिधार्मिकौ ।
तीर दक्षिणामासाथ जग्मतुर्लघुविक्रमौ ॥11॥

करूनी दोन्ही नद्यास प्रणाम दोघे धार्मिक ।
दक्षिण तीरी येता ते त्वरेने चालु लागले ॥11॥

स वनं घोरसंकाशं दृष्ट्वा नरवरात्मजः।
अविग्रहतमैक्ष्वाक: पप्रच्छ मुनिपुङ्गवम् ॥12॥

निबीड घोर अरण्य पाहुनी निर्मनुष्य जे ।
विचारी इक्ष्वाकु राम तेव्हां मुनिपुङ्गवा ॥12॥

अहो वनमिदं दुर्गं झिल्लिकागणसंयुतम् ।
भैरवै: श्वापदै: कीर्णं शकुन्तैर्दारुणारवै: ॥13॥

नानाप्रकारैः शकुनैर्वाश्यद्भिर्भैरवस्वनैः।
सिंहव्याघ्रवराहैश्च वारणैश्चापि शोभितम् ॥14॥
धवाश्वकर्णककुभैर्बिल्वतिन्दुकपाटलैः ।
संकीर्ण बदरीभिश्च किं न्विदं दारुणं वनम् ॥15॥

किती भयंकर वन हे कीटक ध्वनीमुळे ।
झिल्लझिल्ल करणाऱ्या, श्वापदांनी भयंकर ॥13॥
नानापक्षी भरलेले जे करती शब्द दारुण ।
इतरहि पक्षी जेजे विचित्र स्वर काढती ॥14॥

सिंह,व्याघ्र,वराहांनी गजयुक्तहि ते असे ।
अश्वकर्ण धव तैसे ककुभ बिल्व सिंदुक ।
बदरी वृक्ष केले हे कुणी अरण्य दारुण ॥15॥

तमुवाच महातेजा विश्वामित्रो महामुनिः ।
श्रूयतां वत्स काकुत्स यक्षैत दारुणं वनम ॥16॥

महामुनि विश्वानित्र त्यांना ऐक सांगती ।
अरण्य निबिड हे ऐसे पूर्वी असति या इथे ॥16॥

एतौ जनपदौ स्फीतौ पूर्वमास्तां नरोत्तम ।
मलदाश्च करूषाश्च देवनिर्माणनिर्मिती ॥17॥

मलद करूष ऐसे प्रदेश समृद्ध सुन्दर ।
देवलोकासम होते या स्थानि पुरुषोत्तमा ॥17॥

पुरा वृत्रवधे राम मलेन समभिप्लुतम् ।
क्षुधा चैव सहस्राक्षं ब्रह्महत्या समाविशत ॥18॥

वृत्रासुरा वधिता इंद्र क्षुधित मललिप्त हो ।
तशीच तया मागे ब्रह्महत्या लागली ॥18॥

तमिन्द्रं मलिनं देवा ऋषयश्च तपोधना:।
कलशै: स्नापया मासुर्मलं चास्य प्रमोचयन ॥19॥

त्या मलिन इंद्राला ऋषी तपोधन घालती ।
स्नान गंगाजले त्याचा मल तो काढिला इथे ॥19॥

इहं भूम्यां मलं दत्वा देवा: कारूषमेव च ।
शरीरजं महेन्द्रश्च ततो हर्षं प्रपेदिरे ॥20॥

देउनी मल कारूष भूमीवर येथल्या ।
महेन्द्रदेहातील देवांना हर्ष जाहला ॥20॥

निर्मलो निष्करूपश्च शुद्ध इन्द्रो यथाभवत ।
ततो देशस्य सुप्रीतो वरं प्रादादनुत्तमम् ॥21॥

होत मल क्षुधा नष्ट जाहला इन्द्र शुद्ध तो।
संतुष्ट होउनी देई वर भूमीस उत्तम ॥21॥

इमौ जनपदौ स्फीतौख्यातिं लोके गमिष्यत: ।
मलदाश्च करूषाश्च ममाङ्गमलधारिणौ ॥22॥

प्रदेश होतिल दोन प्रसिद्ध समृद्धही ।
मलद आणी करुष मल जे मम साहती ॥22॥

साधु साध्विति तं देवा: पाकशासनमब्रुवन् ।
देशस्य पूजां तां दृष्ट्वा कृतां शक्रेण धीमता ॥23॥

सन्मान असा देशाचा झालेला पाहुनी ऋषि ।
म्हणती उत्तम झाले देवेन्द्रा अनुमोदती ॥23॥

एतौ जनपदौ स्फीतौ दीर्घकालमरिंदम ।
मलदाश्च करूषाश्च मुदिता धनधान्यत: ॥24॥

हे शत्रुदमना रामा दीर्घकाल प्रसिद्ध हे ।
मलद मरूष नामे सुखी समृद्ध मोदित ॥24॥

कस्यचित्वथ कालस्य यक्षिणी कामरूपिणी ।
बलं नागसहस्रस्य धारयन्ती तदा ह्यभूत् ॥25॥
ताटका नाम भद्रं ते भार्या सुन्दस्य धीमत: ।
मारिचो राक्षसो पुत्रो यस्या: शक्रपराक्रम: ॥26॥
वृत्तबाहुर्महाशीर्षो विपुलास्यतनुर्महान् ।
राक्षसो भैरवाकारो नित्यं त्रसयते प्रजा: ॥27 ॥

कालानंतर काही यक्षिणी कामरूपिणी ।
बळ सहस्र नागांचे असे अंगामध्ये तिच्या ॥25॥

सुंदाची असे पत्नी ती ताटका नाम ते तिचे ।
पराक्रमी इंद्रतुल्य मारीच तिचा सुत ॥26॥
पिळदार तया बाहू शरीरहि प्रचंड त्या ।
भयंकर मुद्रेचा तो सकलां त्रासतो महा ॥27॥

राक्षसो भैरवाकारो नित्यं त्रासयते प्रजा:।
इमौ जनपदौ नित्यं विनाशयति राघव ॥28॥
सेयं पन्थानमावृत्य वसत्यत्यर्धयोजने ।
अत एव च गन्तव्यं ताटकाया वनं यत: ॥29॥

राक्षस भयंकर रूपी प्रजेला त्रास देतसे ।
विनाश सदा करती जनपथांचा दोन या ॥28॥
अर्धा योजन ती दूर राहते अडवुनी पथ ।
म्हणून आता लागेल जाण्यास तिच्या वनी ॥29

स्वबाहुबलमाश्रित्य जहीमां दुष्टचारिणीम् ।
मन्नियोगादिमं देशं कुरु निष्कंटकं पुन: ॥30॥
नहि कश्चिदिनं शक्तो ह्यागन्तुमीदृशम् ।
यक्षिण्या घोरया राम शक्तो उत्सादितमसह्यया ॥31॥

इतत्ते सर्वमाख्यातं यथैतद्दारुणं वनम्।
यक्ष्या चोत्सादितं सर्वमयापि न निवर्तते ॥32॥

वापरूनि बळ बाहूंचे मम आज्ञेने वधी तिला।
आणि निष्कंटक हा करी पुनरपि देश हा ॥30॥
कारण येथे येण्यास समर्थ नच कोणिही।
प्रदेशी जो असे केला यक्षिणीने उजाड त्या ॥31॥
अश्या प्रकारे झाले रण दारुण राघवा।
तुज सांगितले मी ते येत पूर्वस्थितीस ना ॥32॥

# इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे चतुर्विंशः सर्गः ॥

# बालकाण्ड सर्ग 25
# ताटका वर्णन

अथ तस्याप्रमेयस्य मुनेर्वचनमुत्तमम् ।
श्रुत्वा पुरुषशार्दुल:प्रत्युवाच शुभाम् गिरम् ॥1॥
अल्पवीर्या यदा यक्षी श्रूयते मुनिपुङ्गव: ।
कथं नागसहस्रस्य धरयात्यबलाबलम् ॥2॥
इत्युक्तं वचनं श्रुत्वा राघवस्यामितौजस: ।
हर्षयन्छलक्ष्णया वाचा सलक्ष्मणमरिंदमम् ॥3॥

असे प्रभावी मुनींचे अनुपम बोल ऐकुनी ।
पुरुषश्रेष्ठ जो राम विचारी शुभवाणिने ॥1॥
यक्षिणीचे असे अल्प मुनिराज बल श्रुत ।
कसे मग या अबलेला सहस्र हत्तींचे बळ ॥2॥
तेजस्वी राघवाचा हा ऐकुनी प्रश्न होउनी ।
प्रसन्न गोड शब्दात उभयां मुनि सांगती ॥3॥

विश्वामित्रोऽब्रवीद्वाक्यं श्रुणु येन बलोत्कटा ।
वरदानकृतं वीर्यं भरयत्यबला बलम् ॥4॥

विश्वामित्र तया बोले ऐक ती बलवान कशी ।
वरदानामुळे मिळे कैसे अबलेला असे बळ ॥4॥

पूर्वमासीन्महायक्ष:सुकेतुर्नाम वीर्यवान ।
अनपत्य: शुभाचार: स च तेपे महत्तप: ॥5॥

पूर्वी एक महायक्ष सुकेतु नाम वीर जो ।
अपत्य नसल्याने तो महातप त्यास्तव करी ॥5॥

पितामहस्तु सुप्रीतस्तस्य यक्षपते: तदा ।
कन्यारत्नं ददौ राम ताटका नाम नामत: ॥6॥

प्रसन्न होउनी देत ब्रह्मा यक्षपतीस त्या।
कन्यारत्न जिचे राम ताटका नाम हे असे ॥6॥

ददौ नागसहस्रस्य बलं चास्या: पितामह: ।
न त्वेवं पुत्रं यक्षाय ददौ चासौ महायशा: ॥7॥

तिला गजसहस्रांचे बळ देती पितामह ।
पुत्र ना देति यक्षास उन्मत्त होइल या भये ॥7॥

तं तु बाला विवर्धन्तीं रूपयौवनशालिनीम् ।
जम्भपुत्राय सुन्दाय ददौ भार्यां यशस्विनीम् ॥8॥

कन्या वाढता होई रूपयौवनशालिनी ।
जम्भपुत्र असे सुन्द त्याची पत्नी यशस्विनी ॥8॥

कस्यचित्वथ कालस्य यक्षी पुत्रं व्यजायत ।
मारीचं नाम दुर्धर्षं य: शापाद्राक्षसोऽभवत ॥9॥

काळ जाता पुढे पुत्र यक्षिणीला जो होतसे ।
मारीच नाम दुर्धर्ष शापे राक्षस होतसे ॥9॥

सुन्दे तु निहते राम अगस्त्यमृषिसत्तमम ।
ताटकासह पुत्रेण प्रघर्षयितुमिच्छति ॥10॥

अगस्ति ऋषि शापाने जेव्हां सुन्दास मारती ।
पुत्रासह ताटका सूड त्याचा घेण्यास इच्छिते ॥10॥

भक्षार्थं जातसंरंभ्या गर्जन्ती साभ्यधावत ।
आपतन्ती तु तां दृष्ट्वा अगस्त्यो भगवान् ऋषिः ॥11॥

त्यामुळे क्रुद्ध हो ऊनी गर्जुनी भक्षण्या तयां ।
पाहुनी तिज येताना भगवान अगस्ति ते ॥11॥

राक्षसत्वं भजस्वेति मारीचं व्याजहार सः ।
अगस्त्यः परमामर्षस्ताटकामपि शप्तवान् ॥12॥

शाप देति राक्षस हो मारीचा पुत्र जो तिचा ।
मुनि कृद्ध होउनी ताटकेलाहि शापती ॥12॥

पुरुषादी महायक्षी विकृता विकृतानना ।
इदं रूपं विहायासु दारुणं रूपमस्तु ते ॥13॥

जाऊनी हे तुझे रूप कराल करि धारण ।
अश्या रूपात होशील नरभक्षक यक्षिणी ॥13॥

सैवा शापकृतामर्षात ताटका क्रोधमूर्च्छिता ।
देशमुत्सादयेत्येनमगस्त्यावरितं शुभम् ॥14॥

मिळल्यावर हा शाप क्रोधे बेफाम ताटका ।
उध्वस्त करते आहे तपस्थान अगस्तिचे ॥14॥

एनां राघव दुर्वृत्तां यक्षीं परमदारुणाम् ।
गोब्राह्मणहितार्थाय जहि दुष्ट पराक्रमम् ॥15॥

अशी दुर्वृत्त यक्षी जी असे अतिभयंकर ।
गोब्राह्मण हितासाठी राघवा मार तू तिला ॥15॥

न ह्येनां शापसंसृष्टां कश्चिदुत्सहते पुमान् ।
निहन्तुं त्रिषु लोकेषु त्वामृते रघुनन्दन ॥16॥

शापाने उन्मात्त तिला कोणी न मारण्या शके ।
तिन्ही लोकी तुझ्यावीण समर्थ नच कोणिही ॥16॥

न हि ते स्त्रीवधकृते घृणा कार्या नरोत्तम ।
चातुर्वर्ण्यहितार्थं हि कर्तव्यं राजसूनुना ॥17॥

करण्या स्त्रीवधा राम दया न मनि आण तू ।
चातुर्वर्ण्य हितासाठी प्रजारक्षण होई ते ॥17॥

नृशंसमनृशंसं वा प्रजारक्षणकारणात ।
पातकं वा सदोषं वा कर्तव्यं रक्षता सदा ॥18॥

योग्यायोग्यता पाही ना प्रजारक्षण जो करी ।
असो पातक वा दोष कर्तव्य श्रेष्ठ सर्वदा ॥18॥

राज्यभारनियुक्तानामेष धर्म: सनातन: ।
अधर्म्यां जहि काकुत्स धर्मो यस्यां न विद्यते।॥19॥

राज्याचा भार जो वाही त्याचा धर्म सनातन ।
अधर्म्या मार काकुत्सा येथे धर्म न पाळणे ॥19॥

श्रूयते हि पुरा शक्रो विरोचनसुतां नृप ।
पृथिवीं हन्तुमिच्छन्तींमन्थराम्भ्यसूदयत ॥20॥

मंथरा विरोचनकन्या प्रवृत्त नाशास पृथ्वीच्या ।
तिला इन्द्र वधे हेच प्रसिद्ध पुरुषोत्तमा ॥20॥

विष्णुनां च पुरा राम भृगुपत्नी पतिव्रता ।
अनिद्रं लोकमिच्छन्ती काव्यमाता निषूदिता ॥21॥

इच्छी स्वर्गातुनी इन्द्रा नाशाया भृगुपत्नी जी।
माता शुक्राचार्यांची विष्णूच मारिती तिला ॥21॥

एतैश्चानैश्च बहुभी राजपुत्रैर्महात्मभिः ।
अधर्मसहिता नार्यो हताः पुरुषसत्तमैः

तस्मादेनां घृणां त्यक्त्वा जहि मच्छासनान्नृप ॥22॥

अश्या काही नि कित्येक नारी ज्या धर्म नाशती
वधिले राजपुत्रानी महान पुरुषश्रेष्ठ जे ।
तेव्हां सोडि दया माझ्या आज्ञेने वध तू हिला ॥22॥

**इत्यार्षे श्रीरामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे पंचविंशः सर्गः ॥**

# बालकाण्ड सर्ग 26

# ताटका वध

मुनेर्वचनमक्लीबं श्रुत्वा नरवरात्मजः।
राघवः प्रांजलिर्भूत्वा प्रत्युवाच दृढव्रतः ॥1॥

मुनिंचे ऐकुनी बोल नरवर शौर्ययुक्त जो ।
जोडून राघव हस्ता उत्तरे तो दृढव्रत ॥1॥

पितुर्वचननिर्देशात्पितुर्वचनगौरवात ।
वचनं कौशिकस्येति कर्तव्यमविशंकया ॥2॥

पित्याच्या आज्ञेने तसे त्याचे वचन राखण्या ।
विश्वामित्रांचा आदेश नि:शंक होउनि पाळतो ॥2॥

अनुशिष्टोSस्म्ययोध्यायां गुरुमध्ये महात्मना।
पित्रा दशरथेनाहं नावज्ञेयं हि त्द्वच:॥3॥

आज्ञापिले अयोध्येत पित्याने गुरुजनामध्ये ।
पित्याच्या वचनाची मी अवज्ञा न करीतसे ॥3॥

सोऽहं पितुर्वच: श्रुत्वा शासनाद्ब्रह्मवादिन:।
करिष्यामि न संदेहस्ताटकावधमुत्तमम् ॥4॥

पित्याच्या वचनानुसारे आज्ञेने ब्रह्मवादिच्या।
संदेह न ताटकेचा वध मी करिन निश्चित ॥4॥

गोब्राह्मणहितार्थाय देशस्य च हिताय च।
तत्र चैवाप्रमेयस्य वचनं कर्तुमुद्यत: ॥5॥

गोब्राह्मण हितासाठी देशाच्याहि हितास्तव।
प्रभावाने युक्त त्यांचे आज्ञापालन करीन मी ॥5॥

एवमुक्त्वा धनुर्मध्ये बद्ध्वा मुष्टिमरिंदम:।
ज्याघोषमकरोत्तीव्रं दिश: शब्देन नादयन् ॥6॥

ऐसे बोलुनि मुठीमध्ये धनुष्या शत्रुनाशक ।
धरुनी टणत्कारे दिशा भरुन टाकि तो ॥6॥

तेन शब्देन वित्रस्तास्ताटकावनवासिन: ।
ताटका च सुसंस्क्रुद्धा तेन शब्देन मोहिता ॥7॥

नाद ऐकुनिया प्राणी भयभीत वनातिल ।
शब्दविव्हल होऊनी ताटका क्रुद्ध होतसे ॥7॥

तं शब्दमभिनिध्याय राक्षसी क्रोधमूर्च्छिता ।
श्रुत्वा चाभ्यद्रवत्क्रुद्धा यत्र शब्दो विनिसृत: ॥8॥

ऐकुनी शब्द क्रोधाने राक्षसी भान विसरुनी ।
धावे जिकडुनी शब्द येतसे त्या दिशेकडे ॥8॥

तां दृष्ट्वा राघव: क्रुद्धां विकृतां विकृताननां ।
प्रमाणेनातिवृद्धां च लक्ष्मणं सोऽभ्यभाषत ॥9॥

कृद्ध विकृत विक्राळ अतिप्रचंड शरीरिणी ।
तिला पाहुनिया राम लक्ष्मणास तो बोलला ॥9॥

पश्य लक्ष्मण यक्षिण्या भैरवं दारुणं वपु:।
भिद्येरंदर्शनादस्या भीरूणां हृदयानि च ॥10॥

लक्ष्मणा बघ यक्षिणिचे घोर रूप भयंकर ।
तिज पाहुनी भीरूंचे काळीज थरकांपते ॥10॥

एतां पश्य दुराघर्षां मायाबलसमन्विताम्।
विनिवृतां करोम्यद्य हृतकरणाग्रनासिकाम् ॥11॥

मायाबलसमे युक्त जी अशक्यच जिंकण्या ।
कापुनी नासिका कर्ण परावृत करीन मी ॥11॥

न ह्येनामुत्सहे हन्तुं स्त्रीस्वभावेन रक्षिता ।
वीर्यं चास्यां गतिं चैव हन्यामिति हि मे मति: ॥12॥

स्त्री असल्यामुळे वध्य नसे म्हणुनि मी तिला
तोडूनिया हस्त पाद करितो निष्प्रभ मी तिला ॥12॥

एवं ब्रुवाणे रामे ताटका क्रोधमूर्च्छिता ।
उद्यम्य बाहुं गर्जन्ती राममेवाभ्यधावत ॥13॥

बोलता असे रामाने भान हरपुनि ताटका ।
उभारी हात ती धावे गर्जुनी रामाकडे ॥13॥

विश्वामित्रस्तु ब्रह्मर्षिर्हुंकारेणाभिभर्त्स्य ताम्।
स्वस्ति राघवयोरस्तु जयं चैवाभ्यभाषत ॥14॥

ब्रह्मर्षि ते विश्वामित्र हुंकारून निर्भत्सना ।
करुनी इच्छिती रामा होशील विजयीच तू ॥14॥

उद्धुन्वाना रजो घोरं ताटका राघवावुभौ ।
रजोमेघेन महता तत‍श्चुक्रोध राघव: ॥15॥

उडवीत भयंकर धूळ दोघांवरि करि चाल ती ।
धुळीचे लोट आल्याने दोघे गोंधळती बहू ॥15॥

ततो मायां समास्थाय शिलावर्षेण राघवौ ।
अवाकिरत सुमहता ततश्चुक्रोध राघव: ॥16॥

करी मायेच्या आधारे दोघांवरती राक्षसी ।
प्रचंड शिलावर्षाव करी क्रोधित राघवा ॥16॥

शिलावर्षं महत्तस्या: शरवर्षेण राघव:।
प्रतिवार्योपधावन्त्या: करौ चिच्छेद पत्रिभि: ॥17॥

तिचा वर्षाव शिळांचा शरे राघव थोपवी ।
प्रतिकारार्थ ती धावे शरे तोडी कर तिचे ॥17॥

ततश्छिन्नभुजां भ्रान्तामभ्याशे परिगर्जतीम् ।
सौमित्रिरकरोत्क्रोधाद्धृतकर्णाग्रनासिकाम् ॥18॥

हाताविण जी भ्रान्त दमली गर्जना करी ।
लक्ष्मण क्रोधे तेव्हां तोडितो कान नाकहि ॥18॥

कामरूपधरा सा तु कृत्वा रूपाण्यनेकशः ।
अंतर्धानं गता यक्षी मोहयन्ती स्वमायया
अश्मवर्षं विमुंचंती भैरवं विचचार सा ॥19॥

करीत अश्मवर्षाव संचरे ती इतस्तत

ततस्तावश्मवर्षेण कीर्यमाणौ समन्ततः ।
दृष्ट्वा गाधिसुतः श्रीमनिदं वचनमब्रवीत्॥20॥

अलं ते घृणया राम पापैषा दुष्टचारिणी ।
यज्ञविघ्नकरी यक्षी पुरा वर्धेत मायया ॥21॥

कामरूपिणि ती यक्षी रूपे बहु घेतसे ।
कधी तर मायेने ती अदृश्यहि होतसे ॥19॥

करे ती अश्मवर्षाव दोघांच्याहि सभोवती ।
पाहुनी हे विश्वामित्र तदा वचन बोलती ॥20॥

रामा नको दया आता जंव ही दुष्ट पापिणी।
यज्ञी विघ्न आणी जी ती मायेने वाढु देइ ना ॥21॥

वध्यतां तावदेवैषा पुरा सन्ध्या प्रवर्तते ।
रक्षांसि संध्याकाले तु दुर्घर्षाणि भवन्ति हि ॥22॥

संध्यासमयापूर्वीच वधी तिज कारण ।
जिंकण्या दुर्धर होईल सन्ध्यासमय पातता ॥22॥

इत्युक्तः स तु ताम् यक्षीमश्मवृष्टयाभिवर्षिणीम् ।
दर्शयंच्छ्वंदवेधित्वं तां रुरोच स सायकैः ॥23॥

वचन हे ऐकुनी त्यांचे पाषाण वृष्टि जी करी ।
शब्दवेधे तिज जाणून जखडे शरवर्षुनी ॥23॥

सा रुद्रा बाणजालेन मायाबलसमन्विता ।
अभिदुद्राव काकुत्स्थं लक्ष्मणं च विनेदुषी ॥24॥

शरबद्धा रौद्र रूपात ती गर्जुनी आपुल्या ।
अंगावर दोघांच्या धावुनी जाउ लागली ॥24॥

तामापतन्ती वेगेन विक्रान्तामशनीमिव ।
शरणोरसि विव्याध पपात च ममार च ॥25॥

अशनीपरि वेगाने धावुनी येत जी ।
राम बाणे करी विद्ध पडे भूमीवरी मृत ॥25॥

तां हतां भीमसंकाशां दृष्ट्वा सुरपतिस्तदा ।
साधु साध्विति काकुत्स्थं सुराश्च्याप्यभिपुजनम् ॥26॥

राक्षसी भीमकाया ती वधली जाइ पाहुनी ।
स्तुती करति रामाची सर्व देव नि इंद्रही ॥26॥

उवाच परमप्रीत: सहस्राक्ष: धुरंधर: ।
सुराश्च सर्वे संदृष्टा विश्वामित्रमथाब्रुवन् ॥27॥

प्रसन्न होउनी इंद्र त्यासवे देवही तसे ।
मुनि विश्वामित्रांना आदरे वदती असे ॥27॥

मुने कौशिक भद्रं ते सेन्द्राः सर्वे मरुद्गणाः ।
तोषिताः कर्मणानेन स्नेहं दर्शय राघवे ॥28॥

कल्याण असो आपले इंद्रासह सर्व देवही ।
आपल्या कर्मे संतुष्ट राघवासी आशिर्वच ॥28॥

प्रजापतेः कृशाश्वस्य पुत्रान् सत्यपराक्रमान् ।
तपोबलभृतो ब्रह्मन्राघवाय निवेदय ॥29॥

प्रजापति कुशाश्वाचे पुत्र सत्यपराक्रमी ।
असती शस्त्ररूपी जे द्या रामास तपस्वि जो ॥29॥

पात्रभूतश्च ते ब्रह्मन्तवानुगमने रत: ।
कर्तव्यं सुमहत्कर्म सुराणां राजसूनुना ॥30॥

शुश्रुषातत्पर तो आहे तव पात्र त्यासाठि तो ।
महत्कार्यास देवांच्या आहे त्यास करायचे ॥30॥

एवमुक्त्वा सुरा: सर्वे जग्मुर्दृष्टा विहायसम् ।
विश्वामित्रं पूजयन्तस्तत: सन्ध्या प्रवर्तते ॥31॥

ऐसे म्हणुनिया देव विश्वामित्रास पूजुनी ।
निघुनी जाति स्वस्थानी होत सन्ध्याकाळही ॥31॥

ततो मुनिवर: प्रीतस्ताटकावधतोषित: ।
मूर्ध्नि राममुपान्याय इदं वचनमब्रवीत ॥32॥

मुनिवरही संतुष्ट ताटकेच्या वधामुळे ।
मस्तकी अवघ्राण करूनि बोलती वच ॥३२॥

इहाथ रजनीं राम वसाम शुभदर्शन ।
श्व:प्रभाते गमिष्यामस्तदाश्रमपदं मम ॥33॥

इथेच राहुनी रात्री हे रामा शुभदर्शना ।
प्रात:काळी उद्या जाऊ निघोनी आश्रमा मम ॥33॥

विश्वामित्रवच: श्रुत्वा हृष्टो दशरथात्मज:।
उवास रजनीं तत्र ताटकाया वने सुखम् ॥34॥

ऐकोनी विश्वामित्राचे आनंदी राम लक्ष्मण ।
ताटकेच्या वनामध्ये सुखाने रात्र काढती ॥34॥

मुक्तशापं वनं तच्च तस्मिन्नेव तदाहनि ।
रमणीयं विबभ्राज यथा चैत्ररथं वनम् ॥35॥

शापमुक्त झाल्याने रमणीय दिसे आता ।
चैत्ररथ वन जैसे तेव्हां शोभु लागले ॥35॥

निहत्य तां यक्षसुतां स रामः प्रशस्यमानः सुरसिद्धसंघैः ।
उवास तस्मिन्मुनिना सहैव प्रभातवेलां प्रतिबोध्यमान ॥36॥

यक्षिणिला त्या मारुनि राम प्रशंसित सुर सिद्धगणांनी।
मुनिसमवेत करी वास्तव्या प्रतीक्षा करी प्रभातसमया ॥36॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे षट्विंशः सर्गः॥**

# बालकाण्ड सर्ग 27

अथ तां रजनीमुष्य विश्वामित्रो महायशा:।
प्रहस्य राघवं वाक्यं उवाच मधुरस्वरम् ॥1॥

तेथ काढुनिया रात्र विश्वामित्र महामुनी ।
हसुनि बोलती वाक्य राघवा मधुरस्वरे ॥1॥

परितुष्टोऽस्मि भद्रं ते राजपुत्र महायश:।
प्रीत्या परमया युक्तो ददाम्यस्त्राणि सर्वश: ॥2॥

महायशस्वि हे पुत्रा, तुझ्यावर सन्तुष्ट मी ।
प्रेमपूर्वक अर्पीन अस्त्रे सर्व तुलाच मी ॥2॥

देवासुरगणान्वापि सगन्धर्वोरगान्भुवि ।
यैरमित्रान्प्रसाह्याजो वशीकृत्य जयिष्यसि ॥3॥

पृथ्वीवरील गन्धर्व राक्षसांसह वर्तमान ।
रणावरि शत्रू जे जे जिंकशील वशीकृत ॥3॥

तानि दिव्यानि भद्रं ते ददाम्यस्त्राणि सर्वशः।
दंड चक्रं महद्दिव्यं तव दास्यामि राघव ॥4॥

सर्व ती दिव्य अस्त्रे मी तुला देइन पूर्णत:।
दंडचक्र तसे दिव्य महान देइन राघवा ॥4॥

धर्मचक्रं ततो वीर कालचक्रं तथैव च ।
विष्णुचक्रं तथात्युग्रमैंन्द्रं चक्रं च ॥5॥

धर्मचक्र तसे उग्र अत्यंत कालचक्र जे ।
इंद्रचक्रहि देईन विष्णुचक्रहि ते तसे ॥5॥

वज्रमस्त्रं नरश्रेष्ठ शैवं शूलवतं तथा ।
अस्त्रंब्रह्मशिरश्चैव ऐषीकमपि राघव ॥6॥

नरश्रेष्ठा तुला रामा वज्रास्त्र नि शैवास्त्रही ।
अस्त्र ब्रह्मशिरो नाम ऐषीकास्त्रहि राघवा ॥6॥

ददामि ते महाबाहो ब्राह्म्यमस्त्रमनुत्तमम् ।
गदे द्वे चैव काकुत्स्थ मोदकी शिखरी शुभे ॥7॥

महाबाहो तुला देतो ब्रह्मास्त्र जे अनुपम ।
मोदकी शिखरी नाम गदाही दोन उज्वल ॥7॥

प्रदीप्ते नरशार्दूल प्रयच्छामि नृपात्मज ।
धर्मपाशमहं राम कालपाशं तथैव च ॥8॥

वारुणं पाशमस्त्रं च ददाम्यहमनुत्तमम् ।
अशनी द्वे प्रयच्छामि शुष्कार्द्रे रघुनंदन ॥9॥

महापराक्रमी रामा तुज देतो नृपात्मजा ।
धर्मपाश असे अस्त्र कालपाशहि ते तसे ॥8॥
वारुणपाश हे अस्त्र तुज अनुपम देत मी ।
अशनीसंज्ञक दोन अस्त्रे शुष्क नि आर्द्र ही ॥9॥

ददामि चास्त्रं पैनाकं अस्त्रं नारायणं तथा ।
आग्नेयमस्त्रं दयितं शिखरं नाम नामत: ॥10॥

देईन अस्त्र पैनाक तसे नारायणास्त्रही ।
आग्नेयास्त्रहि देतो ज्या शिखर नामेहि जाणती ॥10॥

वायव्यं प्रथमं नाम ददामि तव चानघ ।
अस्त्रं हयशिरो नाम क्रौंचमस्त्रं तथैव च ॥11॥

वायव्यास्त्र असे मुख्य निष्पापा तुज देत मी ।
तसे हयशिरो नाम क्रौन्च अस्त्रहि देतसे ॥११॥

शक्तिद्वयं च काकुत्स्थ ददामि तव राघव ।
कंकालं मसलं घोर कापालमथ किण्किणीम ॥12॥

शक्तिद्वय काकुत्स्था राघवा तुज देत मी ।
कंकाल .मुसल,घोर कापाल किंकिणी वधा ॥12॥

वधार्थं रक्षसां यानि ददाम्येतानि सर्वश:।
वैद्याधरं महास्त्रं च नन्दन नाम नामत:॥13॥

राक्षसां वधण्यासाठी ही तुला देत सर्व मी ।
महान नन्दन नामे वैद्याधर अस्त्र देतसे ॥13॥

असिरत्नं महाबाहो ददामि नृवरात्मज ।
गान्धर्वमस्त्रं दयितं मोहनं नाम नामत: ॥14॥

अंसिरत्न तुला देतो महाबाहू नृपात्मजा ।
गान्धर्वास्त्र तसे देतो नाम मोहन ज्याचिया ॥14॥

प्रस्वापनं प्रशमनं दद्मि सौम्यं च राघव ।
वर्षणं शोषणं चैव संतापनविलापने ॥15॥

प्रस्वापन तसे सौम्य देतो प्रशमनास्त्र मी ।
वर्षण शोषणही तैसे संतापन ,विलोपन ॥15॥

मादनं चैव दुर्घर्षं कन्दर्पदयितं तथा ।
गान्धर्वमस्त्रं दयितं मानवं नाम नामत: ॥16॥

मदनाप्रिय जे अस्त्र दुर्घर्ष फार मादन ।
प्रसिद्ध मानव नामे गान्धर्वास्त्र तसेहि ते ॥16॥

पैशाचमस्त्रं दयितं मोहनं नाम नामत: ।
प्रतीच्छ नरशार्दूल राजपुत्र महायश:॥17॥

पिशाच्चप्रिय जे अस्त्र नाव मोहन ज्या असे ।
यशस्वी नरशार्दूला स्वीकारी तू महायशा ॥17॥

तामसं नरशार्दूल सोमनं च महाबलम्‌ ।
संवर्तं चैव दुर्धर्षं मौसलं च नृपात्मज ॥18॥

सत्यमस्त्रं महाबाहो तथा मायामयं परम् ।
सौरं तेज:प्रभं नाम परतेजोऽपकर्षणम् ॥19॥

तामस,सोमन,संवर्त मौसल नामाने अश्त्र।
अस्त्रे अतिप्रखर जी तुज देतो नृपात्मजा ॥18॥
सत्य मायामय अस्त्रे देतो तेज:प्रभ तसे ।
ते असे सूर्यदेवाचे शत्रुचे तेज नाशक ॥19॥

सौम्यास्त्रं शिशिरं नाम त्वाष्ट्रमस्त्रं सुदारुणम् ।
दारुणं च भगस्यापि शीतेषुमथ मानदम् ॥20॥

शिशिर नाम सौम्यास्त्र त्वाष्ट्रास्त्र अतिदारुण।
तैसे भगास्त्र शीतेषु तसे मानव अस्त्रही ॥20॥

एतान्राम महाबाहो कामरूपान्महाबलान्।
गृहाण परमोदारान्क्षिप्रमेव नृपात्मज।

महाबाहू अश्या रामा कामरूपी महाबळी।
परिणामकरी अस्त्रे शीघ्र ग्रहण तू करी ॥21॥

स्थितस्तु प्राङ्ग्मुखौ भूत्वा शुचिर्मुनिवरस्तदा
ददौ रामाय सुप्रीतो मन्त्रग्राममनुत्तमम्।

सर्वसंग्रहणं येषां दैवतैरपि दुर्लभम् ॥22॥

पूर्वाभिमुख होऊनी पवित्र मुनि होत ते ।
प्रसन्न होत रामाला सागती अस्त्रमंत्र ते ।
जी अस्त्रे प्राप्त होणे देवतांनाहि दुर्लभ ॥22॥

तान्यस्त्राणि तदा विप्रो राघवाय न्यवेदयत ।
जपतस्तु मुनेस्तस्य विश्वामित्रस्य धीमत: ॥23॥
उपतस्तुर्महार्हाणि सर्वाण्यस्त्राणि राघवम् ।
ऊचुश्च मुदिता: सर्वे रामं प्रांजलयस्तदा ॥24॥

जेव्हां सर्व अशी अस्त्रे मुनि रामास सांगती ।
मन्त्रजप विश्वामित्रे करता साक्षात घेउनी ॥23॥
सर्व ती रामापुढती येउनीया हात जोडुनी ।
आनंदित हो उनीया तयाप्रति बोलती ॥24॥

इमे स्म परमोदारा: किंकरास्तव राघव ।
प्रतिगृह्य च काकुत्स्थ: समालभ्य च पाणिना ।
मानसा मे भविष्यध्वमिति तानभ्यचोदयत ॥25॥
तत: प्रीतमन: रामो विश्वामित्रं महामुनिम् ।

अभिवाद्य महातेजा गमनायोपचक्रमे ॥26॥

हे परमोदारा आम्ही दास आहोत ते तुझे ।
आपले जे असे कर्म करण्या बद्ध आम्हिही
स्पर्शुनी त्यां वदे राम स्मरता येउनी करा ॥25॥
आनंदित तदा राम विश्वामित्रांस वंदुनी ।
महामुनिंना बोले निघण्यास तयार मी ॥26॥

**इत्यर्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीय महाकाव्ये सप्तविंशः सर्गः ॥**

# बालकाण्ड सर्ग 28

प्रतिगृह्य ततोऽस्त्राणि प्रहृष्टवदन: शुचि:।
गच्छन्नेव च काकुत्स्थो विश्वामित्रमथाब्रवीत ॥1॥

स्वीकारुनि अस्त्रां सर्व शूचिर्भूत प्रसन्न तो
निघताना काकुत्स्थ विश्वामित्रां असे म्हणे ॥1॥

गृहीतास्त्रोऽस्मि भगवन्दुराघर्ष: सुरैरपि ।
अस्त्राणां त्वहमिच्छामि संहारान्मुनिपुङ्गव ॥2॥

स्वीकारुनि मी अस्त्रे देवांनाही अजिंक्य मी ।
संहार करावा कैसा जाणण्या इच्छितो आता ॥2॥

एवं ब्रुवति काकुत्स्थे विश्वामित्रो महातपा:।
संहारान्व्याजहाराथ धृतिमान्सुव्रत: शुचि: ॥3॥

म्हणता ऐसे काकुत्स्थ विश्वामित्र शुचिव्रत ।
महातप सांगती ते तैसे उपसंहार त्या ॥3॥

सत्यवंन्तं सत्यकीर्तिं धृष्टं रभसमेव च ।
प्रतिहारतरंनाम पराङ्ग्मुख वाङ्ग्मुखं ॥4॥

लक्ष्यालक्ष्याविमौ चैव दृढनामसुनाभकौ ।
दशाक्षशतवक्त्रौ च दशशीर्ष शतोदरौ ॥5॥

सत्यवान सत्यकीर्ति,प्रतिहारतर धृष्ट ।
पराङ्ग्मुख अवाङ्ग्मुख हे लक्ष्य आणि अलक्ष्यही ॥4॥
दृढनाभ वसुनाभ,दशाक्ष शतवक्त्र ही ।
दशशीर्ष शतोदर ते पद्मनाभ महानाभ ॥5॥

पद्मनाभमहानाभौ दुन्दुनाभस्वनाभकौ ।
ज्योतिषं शकुनं चैव नैरास्यविमलावभौ ॥6॥

दुंदुनाभ स्वनाभहि ते ज्योतिष,शकुन ते तसे ।
नैरास्य,विमल दोन्ही,दैत्यनाशक ,विनिद्रही ॥6॥

योगन्धरविनिद्रौ च दैत्यप्रमथनौ तथा ॥7॥
शुचिबाहुर्महाबाहुर्निष्क्लिर्विरुचस्थथा ।
सार्चिमाली धूतिमाली वृत्तिमान्रुचिरस्तथा ॥8॥

हे अस्त्ररूप देतो मी कुशाश्वपुत्र तुला ।
शुचिबाहु,महाबाहु सार्चिमाली विरुचही ॥7॥
वृत्तिमान रुचिर पित्र्य सौमनसहि त्यांसवे । विभूत आणी मकर परवीर रती,जृंभक ॥8॥

पित्र्य:सौमनसश्चैव विधृतमकरावुभौ ।
परवीरं रतिं चैव धनधान्यौ च राघव ॥9॥

धन,धान्य सर्पनाथ पंथान वरुणासवे ।
जे यथेष्ट रूपे घेती तेजोमय अस्त्ररूपही ॥9॥

कामरूपं कामरुचिं मोहमावरणं तथा ।
जृम्भकं सर्पनाथं च पन्थानवरुणो तथा ॥10॥
कृशाश्वतनयान्नाम भास्वरान्कामरूपिण: ।
प्रतीच्छ मम भद्रं ते पात्रभूतोऽसि राघव ॥11॥

कुशाश्वपुत्र ऐसे हे देत मी राघवा तुला।
दानास जो या पात्र असो कल्याणही तुझे ॥10॥
अनेक ऐसी अस्त्रे देति ऋषिवर्य राघवा ।
ज्यामुळे होतसे पात्र जिंकण्या देवदानवा ॥11॥

बाढमित्येव काकुत्स्थ: प्रहृष्टेनान्तरात्मना ।
दिव्यभास्वरदेहाश्च मूर्तिमन्त: सुखप्रदा ॥12॥

यावरी म्हणुनी ''होय''स्वीकारी संतोषुनी ।
ककुत्स्थ कुलोत्पन्न प्रसन्न वदने तयां ॥12॥

केचिद्ङ्गारसदृशा: केचित्धूमोपमास्तथा ।
चंद्रार्कसदृशा: केचित्प्रह्वान्जलिपुटास्तथा ॥13॥
रामं प्रांजलयो भूत्वाब्रुवन्मधुरभाषिण: ।
इमे स्म नरशार्दूल शाधि किं करवाम ते ॥14॥

दिव्य उज्वल देही जे अग्नी,धूम्र सदृश्यही ।
चंद्रासम सूर्यासम तेजस्वी येत तेथ ते ॥13॥
हात जोडुनि रामास मधुर भाषेत बोलती ।
आम्ही येथ नरशार्दूला आज्ञा काय असे तव ॥14॥

गम्यता इति तामाह यथेष्टं रघुनन्दनः ।
मानसाः कार्यकालेषु साहाय्यं मे करिष्यथ ॥15॥

रघुनन्दन जाण्यास सांगुनी विनवी तयां ।
कार्यकाली सहाय्यास व्हा उपस्थित आपण ॥15॥

अथ ते राममामन्त्र्य कृत्वा चापि प्रदक्षिणम् ।
एवमस्त्विति काकुत्स्थमुक्त्वा जग्मुर्यथागतम् ॥16॥

ऐकुनी बोला रामाच्या सम्मती देति सर्व ते ।
प्रदक्षिणा घालुनी त्यास जाती आले तसेच ते ॥16॥

स च तान्राघवो ज्ञात्वा विश्वामित्रं महामुनिम् ।
गच्छन्नैवाथ मधुरं श्लक्ष्णं वचनमब्रवीत ॥17॥

गमनानंतर त्यांच्या विश्वामित्रांस राघव ।
मधुर मृदु वाणीने प्रश्न काही विचारत ॥17॥

किमेतन्मेघसंकाशं पर्वतस्याविदूरत: ।
वृक्षखण्डमितो भाति परं कौतूहलं च मे ॥18॥

पर्वताजवळी वृक्षसमूह मेघतुल्य जो ।
तो वनी आश्रमी वा कुतूहल हे मज ॥18॥

दर्शनीयं मृगाकीर्णं मनोहरमतीव च ।
नानाप्रकारैः शकुनैर्वल्गुभाषैरलंकृतम् ॥19॥
नि:सृता: स्म मुनिश्रेष्ठ कान्ताराद्रोमहर्षणम् ।
अनया त्ववगच्छामि शस्य सुखवत्तया ॥20॥

दर्शनीय असे व्याप्त मृगांनी अतिसुंदर ।
मधुर स्वर करणाऱ्या पक्षांनी अतिशोभित ॥19॥

नि:सृता: स्म मुनिश्रेष्ठ कान्ताराद्रोमहर्षणात ।
अनया त्ववगच्छामि देशस्य सुखवत्तया ॥20॥

मुनिश्रेष्ठ प्रदेशाची पाहुनी सुखमयी स्थिती ।
दुर्गम ताटकावन सोडूनी वाटे बाहेर आपण ॥20॥

सर्वं मे शंस भगवन्कस्याश्रमपदं त्विदम् ।
संप्राप्ता यत्र ते पापा ब्रह्मघ्ना दुष्टचारिण:॥21॥

सर्व हे मजला सांगा आपला आश्रम कुठे।
कोठे येति महापापी दुष्ट छळती ब्राह्मणां ॥21॥

तव यज्ञस्य विघ्नाय दुरात्मनो महामुने ।
भगवंस्तस्य को देश: सा यत्र तत्र याज्ञिकी ॥22॥

रक्षितव्या क्रिया ब्रह्मन्मया वध्याश्च राक्षसा:।
एतत्सर्वं मुनिश्रेष्ठ श्रोतुमिच्छाम्यहं प्रभो ॥23॥

आणती विघ्न यज्ञात दुरात्मे हे महामुनी ।
कोणता भूभाग जेथ यज्ञ करता आपण॥22॥
राक्षसा वधुनी यज्ञ रक्षणे मजला कुठे ।
हे सर्व ऐकण्या ब्रह्मन आपणाकडुन इच्छितो ॥23॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे अष्टविंश: सर्ग: ॥**

# बालकाण्ड सर्ग 29

अथतस्याप्रमेयस्य वचनं परिपृच्छत: ।
विश्वामित्रो महातेजा व्याख्यातुमुपचक्रमे ॥1॥

अनुपमेय असा राम विचारी प्रश्न जेधवा ।
विश्वामित्र महातेज द्याया उत्तर लागले ॥1॥

इह राम महाबाहो विष्णुर्देव नमस्कृत: ।
वर्षाणि सुबहूनीह तथा युगशतानि च ॥2॥

रामा शूर इथे केले देवांना वंद्य विष्णुने ।
वास्तव्य तपासाठी वर्षे शत नव्हे युगे ॥2॥

तपश्चरणयोगार्थमुवास सुमहातप:।
एष पूर्वाश्रमो राम वामनस्य महात्मन:॥3॥

अवतार वामनाचा घेण्यापूर्वी तपास्तव ।
वास्तव्य विष्णुने केले तपसिद्धीस्तव इथे ॥3॥

सिद्धाश्रम इति ख्यात: सिद्धो ह्यत्र महातपा:।
एतस्मिन्नेव काले तु राजा वैरोचनिर्बलि: ॥4॥

महातप इथे सिद्ध म्हणुनी हा सिद्धाश्रम ।
याच कालामध्ये राजा विरोचनपुत्र जो बली ॥4॥

निर्जित्य दैवतगणान्सेन्द्रान्सहअमरुद्गणान ।
कारयामास तद्राज्यं त्रिषु लोकेषु विश्रुत:।
यज्ञं चकार सुमहान् सुरेन्द्रो महाबल: ॥5॥
बलेस्तु यजमानस्य देवा: साग्नि पुरोगमा:।
समागम्य स्वयं चैव विष्णुमूचुरिहाश्रमे ॥6॥

सर्व देवांस जिंकुनी इंद्रा आणि मरुद्गणा ।

तिन्ही लोकात आरंभ राज्य करण्यास तो करी ॥
सुरेन्द्र बलि महान यज्ञ एक करीतसे ॥5॥
पाहुनी यज्ञा करता अग्निप्रभृति देव ते ।
विष्णूकडे स्वत: येती आश्रमी आणि बोलती ॥6॥

बलिर्वैरोचनिर्विष्णो यजते यज्ञ उत्तमम् ।
असमाप्तव्रते तस्मिन्स्वकार्यमभिपद्यताम् ॥7॥
ये चैनमभिवर्तन्ते याचितार इतस्तत: ।
यच्च यत्र यथावच्च सर्वं तेभ्य: प्रयच्छति ॥8॥

स त्वं सुरहितार्थाय मायायोगमुपाश्रित:।
वामनत्वं गतो विष्णो कुरु कल्याणमुत्तमम् ॥9॥

बलि विरोचनपुत्र करीतो यज्ञ उत्तम ।
समाप्त तो होण्यापूर्वी करावे कार्य आपुले ॥7॥
जे कोणी येथतेथोनी जाति याचक त्याकडे ।
जे जे मागति ते सर्व यथावत अर्पितो तयां ॥8॥
देवांचे हित साधाया मायायोगावलंबुनी ।
धारुनी वामनत्वास कल्याण आमुचे करा ॥9॥

एतस्मिन्नंतरे राम कश्यपोऽग्निसमप्रभ ।
अदित्या सहितो राम दीप्यमान इवौजसा ॥10॥
देवीसहायो भगवान्दिव्यं वर्षसहस्रकम् ।
व्रतं समाप्य वरदं तुष्टाव मधुसूदन ॥11॥

याच काळात हे रामा कश्यप अग्निसमप्रभ ।
तेजस्वी अदितीसंगे तप वर्ष सहस्रक ॥10॥
देवीसह करुनी पूर्ण तोषवी मधुसूदना ।
स्तवती वरप्रद जो तया तुष्टविण्यास्तव ॥11॥

तपोमयं तपोराशिं तपोमूर्तिं तपात्मकं ।
तपसा त्वां सुतप्तेन पश्यामि पुरुषोत्तमम् ॥12॥

तपोमय तपोराशि तपोमूर्ति तपात्मकं
अश्या तुज पहाया मी शक्य केल्या तपामुळे ॥12॥

शरीरे तव पश्यामि जगत्सर्वमिदं प्रभो ।
त्वमनादिरनिर्देश्यस्त्वामहं शरणं गत: ॥13॥

शरीरात तुझ्या शक्य जगता सर्व पाहणे ।
अतर्क्य आणि अनादि तुला शरण येत मी ॥13॥

तमुवाच हरि: प्रीत: कश्यपं धूतकल्मषम् ।
वरं वरय भद्रं ते वरार्होऽसि मतो मम ॥14॥

हरि प्रसन्न होतात कश्यपा पापमुक्त जो ।
कल्याण तव वर माग अससी योग्य त्यास्तव ॥14॥

तच्छ्रुत्वा वचनं तस्य मारीच: कश्यपोऽब्रवीत ।
अदित्य देवतानां च मम चैवानुयाचितम् ॥15॥

ऐकुनी वचना त्याच्या मरिचीमुनि बोलती ।
अदिती,देवता संगे वर प्रार्थित द्या मज ॥15॥

वरं वरद सुप्रीतो दातुमर्हसि सुव्रत ।
पुत्रत्वं गच्छ भगवन्नदित्या मम चानव ॥16॥

भगवन् प्रसन्न होता वर द्या ऐसा मज।
अदितीसंगे माझा पुत्र म्हणुनी जन्मसी ॥16॥

भ्राता भव शचीयांस्त्वं शक्रस्यासुरसूदन ।
शोकार्तानां तु देवानां साहाय्यं कर्तुमर्हसि ॥17॥

हे दैत्यनाशक भ्राता व्हावे इंद्रास आपण ।
शोकग्रस्त देवांच्या करावे साह्य आपण ॥१७॥

अयं सिद्धाश्रमो नाम प्रसादात्ते भविष्यति ।
सिद्धे कर्मणि देवेश उत्तिष्ठ भगवन्नित: ॥18॥

प्रसादे आपुल्या नामे सिद्धाश्रम प्रसिद्ध हा ।
आपले कार्य हो पूर्ण येथून उठा आता ॥18॥

अथ विष्णुर्महातेजा अदित्यां समजायत ।
वामनं रूपमास्थाय वैरोचनिमुपागतम ॥19॥

महातेजस्वि विष्णूने अदितीपोटि जन्मुनी ।
वामन रूप घेऊनी उपस्थित बळीकडे ॥19॥

त्रीन्पदानथ भिक्षित्वा प्रतिगृह्य च मेदिनीम् ।
आक्रम्य लोकांल्लोकार्थी सर्वलोकहिते रत: ॥20॥

पाउले तीन मागून पृथ्वीस आक्रमीति ते ।
व्यापुनी तिन्ही लोकां जनतेच्या हितास्तव ॥20॥

महेन्द्राय पुन: प्रादान्नियम्य बलिमोजसा ।
त्रैलोक्यं स महातेजाश्चक्रे शक्रवशं पुन:॥21॥

करुनी निग्रह तेजाने बळिचा त्रैलोक्य ते पुन्हा ।
महेन्द्रास पुन्हा देती महातेजस्वि विष्णु ते ॥21॥

तेनैव पूर्वमाक्रान्त आश्रम: श्रमनाशन:।
मयापि भक्त्या तस्यैव वामनस्योपभुज्यते ॥22॥

त्यानी वास्तव्य केलेला आश्रम श्रमहारक ।
वामनाच्या प्रसादे मी उपभोगीत आज त्या ॥22॥

एनमाश्रममायान्ति राक्षसा विघ्नकारिण:।
अत्र ते पुरुषव्याघ्र हन्तव्या दुष्टचारिण:॥23॥

याच आश्रमि येतात विघ्नकारक राक्षस ।
पुरुषव्याघ्रा तुला त्यां दुष्टांना मारणे इथे ॥23॥

अद्य गच्छामहे राम सिद्धाश्रममनुत्तमम् ।
तदाश्रमपदं तात तवाप्येतद्यथा मम ॥24॥

अत्युत्तम सिद्धाश्रमी राम हे जाउ आपण ।
स्थान हे जसे माझे तुझे तैसेचही असे ॥24॥

इत्युक्त्वा परमप्रीतो गृह्य रामं सलक्ष्मणं ।
प्रविशन्नाश्रमपदं व्यरोचत महामुनि:॥25॥
शशीव गतनीहार: पुनर्वसुसमन्वित: ॥26॥

बोलून असे रामा घेऊन लक्ष्मणासवे ।

आश्रमात ते करती प्रवेश प्रसन्न ||25||
जणु पुनर्वसु संगे नभि चंद्र निरभ्रश्या ||26||
टिप- पुनर्वसु नक्षत्रांची जोडी असते

तं दृष्ट्वा मुनय: सर्वे सिद्धाश्रमनिवासिन:|
उत्पत्योत्पत्य सहसा विश्वामित्रमपूजयन्||27||

त्याना पाहुनिया सर्व मुनि सिद्धाश्रमातिल
उत्थापन देऊनी विश्वामित्रांस पूजती ||27||

यथार्हं चक्रिरे पूजां विश्वामित्राय धीमते |
तथैव राजपुत्राभ्यामकुर्वन्नतिथिक्रियाम् ||28||

विश्वामित्रांस पूजूनी यथावत तसे पुढे ।
राजपुत्रांची करती तशीच तिथिक्रिया ॥28॥

मुहूर्तमथ विश्रान्तौ राजपुत्रावरिन्दमौ ।
प्रांजली मुनिशार्दूलमूचतू रघुननदनौ ॥29॥

मुहूर्त घेति विश्रान्ती दोन्हीही राजपुत्र ते ।
मुनिश्रेष्ठांस जोडून हात राम विचारती ॥29॥

अदैव दीक्षां प्रदीक्ष भद्रं ते मुनि पुङ्गव ।
सिद्धाश्रमोऽयं सिद्ध:स्यात्सत्यमस्तु वचस्तथा ॥30॥

दीक्षा द्यावी मुनिश्रेष्ठ ज्यामुळे यज्ञ सिद्धिने ।
सत्य हो सिद्धाश्रम हे नाव आपण जे दिले ॥30॥

एवमुक्तो महातेजा विश्वामित्रो महानृषि: ।
प्रविवेश तदा दीक्षां नियतो नियतेंद्रिय: ॥31॥

ऐकुनिया विश्वामित्र महातेजस्वि ते मुनी ।
दीक्षा त्याना जसे नियत त्यापरी ॥31॥

कुमाराविव तां रात्रिमुषित्वा सुसमाहितौ।
प्रभातकाले चोत्थाय पूर्वां संध्यामुपास्य च ॥32॥

व्यतीत करुनी रात्र आनंदे कुमार ते ।
प्रात:कालि उठोनीया प्रात:संध्या करूनिया ॥32॥

प्रशुची परमं जाप्यं समाप्य नियमेन च ।
हुताग्निहोत्रमासीनं विश्वामित्रमवन्दताम् ॥33॥

शुचि प्राप्त शिवस्कंद विश्वामित्रांस वन्दती
जप समाप्त झालेल्या हुताग्नि अग्निहोत्र ही॥३३॥

**इति श्रीरामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे एकोनत्रिंश: सर्ग: ॥29॥**

# बालकाण्ड सर्ग 30

अथ तौ देशकालज्ञो राजपुत्रावरिन्दमौ ।
देशे काले च वायज्ञावब्रूतां कौशिकं वच: ॥1॥

असे जे जाणती देश काल शत्रुनाशक ।
योग्य काळी आणी वेळी विश्वामित्रां विचारती ||1||

भगवच्छ्रोतुमिच्छावो यस्मिन्काले निशाचरौ ।
संरक्षणीयो तौ ब्रूहि नातिवर्तेत तत्क्षणम ॥2॥

भगवान उत्सुक आम्ही कोणत्या कालि रक्षण ।
निशाचरांपासूनी करणे आम्हा आवश्यक ॥2॥

एवं ब्रुवाणो काकुत्स्थौ त्वरमाणौ युयुत्सवा ।
सर्वे ये मुनय: प्रीता: प्रशंसर्नृपात्मजौ ॥3॥

करता रामलक्ष्मण त्वरा मुनि प्रसन्न हो उनी ।
प्रशंसा करती त्याची आणि बोलति यापरी ॥3॥

अद्यप्रभृति षड्रात्रं रक्षतां राघवौ युवाम् ।
दीक्षां गतो ह्येव मुनिर्मौनत्वं च गमिष्यति ॥4॥

रक्षण आजपासून सहा दिवस तुम्ही करा ।
यज्ञदीक्षा मुनी घेता मौन करिती धारण ॥4॥

तौ तु तद्वचनं श्रुत्वा राजपुत्रो यशस्विनौ ।
अनिद्रं षडहोरात्रं तपोवन्मरक्षताम ॥5॥

त्यांचे वचन ऐकून यशस्वी राजपुत्र ते ।
निद्रा अहोरात्र न घेता तपोवन रक्षिती ॥5॥

उपासांचक्रतुर्वीरौ यत्तौ परमधन्विनौ ।
ररक्षतुर्मुनिवरं विश्वामितमरिन्दमम। ॥}6॥

सज्ज होऊनि धनुर्धारी तयांसमीप राहुनी ।
शत्रुनाशक मुनींच्या करती यज्ञ रक्षण ॥6॥

अथ काले गते तस्मिन्षष्ठेऽहनि तथागते ।
सौमित्रिमद्रवीद्रामो यत्तो भव समाहित: ॥7॥

ऐसे दिन सहा जाता सहाव्या दिनि लक्ष्मणा।
सांगे राम रहाण्या त्या तयार सावधपणे ॥7॥

रामस्यैव ब्रुवाणस्य त्वरितस्य युयुत्सया।
प्रजज्वाल ततो वेदि: सोपाध्यायपुरोहिता॥॥8।

युद्धा उत्सुक तो राम सांगता लक्ष्मणा असे ।
विश्वामित्र सवे ब्रह्मा, अन्य ऋत्विजही तसे ॥8॥

सदर्भचमस्त्रस्त्रुका सस्मित्कुसुमोच्चया ॥
विश्वामित्रेण सहिता वेदिर्जज्वाल सर्त्विजा॥9॥
मन्त्रवच्च यथान्यायं यज्ञोऽसौ संप्रवर्तते ।
आकाशे च महाछन्द: प्रादुरासीद्भयानक: ॥10॥

विश्वामित्र मुनीं बसता दर्भ अन समिधा फुले ।
यांनी संपन्न वेदींत अग्निज्वाला प्रकटती ॥9॥

यथाविधि अनुष्ठान होता प्राप्त समंत्रक ।
आकाशामधुनी मोठा ध्वनि होइ भयानक ॥10॥

आवार्य गगनं मेघो यथा प्रावृषि द्रश्यते ।
तथा मायां विकुर्वाणौ राक्षसावभ्यधावताम ॥11॥

वर्षाकालि जसे मेघ गर्जती त्यापरि राक्षस ।
माया प्रकट करुनीया धावुनी तेथ येति ते 11॥

मारीचस्य सुबाहुश्च तयोनुवरास्तथा \
आगम्य भीमसंकाशा रुचिरौघानवासृजन ॥12॥

मारीच नि सुबाहू ते अनुयायासह येउनी ।
भयंकर राक्षस ते करती रक्तवृष्टिही ॥12॥

तां तेन रुधिरौघेण वेदीं वीक्ष्य समुक्षिताम् ।
सहसाभिद्रुतो रामस्तानपश्यत्ततो दिवि ॥13॥

वेदीला रुधिरस्नान त्यांनी पाहुनि घातले ।
धावुनी येत रामाला आकाशी दिसतीच ते ॥13॥

तावापतन्तो सहसा दृष्ट्वा राजीवलोचनः।
लक्ष्मणं त्वभिसंप्रेक्ष्य रामं वचनमब्रवीत ॥14॥

पश्य लक्ष्मण दुर्वृत्तान्राक्षसान्पिशिताशनान् ।
मानवास्त्रसमाधूताननिलेन यथा घनान् ॥15॥

तया अंगावरी येता धावुनी पाहि राम ते ।
लक्ष्मणाप्रत पाहून बोले वचनास राम या ॥14॥
पहा लक्ष्मणा यांना मेघ वायुवेगे जसे ।
उडवून लावतो आता मानवास्त्रास योजुनी ॥15॥

करिष्यामि न संदेहो नोत्सहे हन्तुमीदृशान् ।
इत्युक्त्वा वचनं रामश्चापे संधाय वेगवान् ॥16॥

मारण्या दुर्बलां ऐश्या मन माझे न घेतसे ।
वचना या बोलून धनुष्या बाण लाविला ॥16॥

मानवो परमोदारमस्त्रं परमभास्वरम् ।
चिक्षेप परमक्रुद्धो मारीचांरसि राघव ॥17॥

अति उज्ज्वल अन् श्रेष्ठ मानवास्त्र मंत्रुनी ।
क्रुद्ध होउनिया राम बाणे वेधि मारिचा ॥17॥

स तेन परमास्त्रेण मानवेन समाहत:।
संपूर्ण योजनशतं क्षिप्त: सागरसंप्लवे ॥18॥

मानव परमास्त्राने विद्ध झालेला असा ।
योजने शत तो जात फेकला सागरामध्ये ॥18॥

विचेतनं विघूर्णन्तं शीतेषु बलपीडितम् ।
निरस्तं दृश्य मारीचं रामो लक्ष्मणब्रवीत ॥19॥

मूर्च्छित होउनी पाही तडफडे मारिचा अश्या ।
पाहुनी लक्ष्मणाला हे राम हे वचन बोलला ॥19॥

पश्य लक्ष्मण शीतेषु मानवं मनुसंहितम् ।
मोहयित्वा नयत्येनं न च प्राणैर्वियुज्यते ॥20॥

बघ लक्ष्मणा याला मोह पाडुनि अस्त्र हे ।
शीतेषुसंज्ञक अस्त्र हे प्राण नच घेतसे ॥20॥

इमानपि वधिष्यामि निर्घृणान् दुष्टचारिणः ।
राक्षसान्पापकर्मस्थान्यज्ञघ्नान्रुधिराशनान् ॥21॥

आता या दुराचारी निर्घृणा यज्ञघातक्यां ।
रक्तप्राशन करणाऱ्या राक्षसांसहि मारतो ॥21॥

इत्युक्त्वा लक्ष्मणं चाशु लाघवं दर्शन्निव ।
विगृह्य सुमहच्चास्त्रमाग्नेयं रघुनन्दन ॥22॥

असे बोलूनि भ्रात्याला दावाया जणु लाघव ।
प्रचंड आग्नेयास्त्रा हाती घेउनि राघव ॥22॥

सुबाहुरसि चिक्षेप स विद्धः प्रापतद्भुवि ।
शेषान्वायव्यमादाय निजधान महायशाः॥23॥

सुबाहूवर फेकी ते विद्ध होउनि तो पडे ।
इतरांनाहि वधे राम वायव्यास्त्र फेकुनी ॥23॥

राघवः परमोदारो मुनींनां मुदमावहन् ।
स हत्वा राक्षसान्सर्वान् यज्ञघ्नान्रघुनन्दनः ॥24॥

परमोदार रामाने यज्ञघ्ना सर्व राक्षसां ।
मारुनी मुनिंना सर्व अत्यानंदित तो करी ॥२४॥

ऋषिभि: पूजितस्तत्र यथेन्द्रो विजये पुर: ।
अथ यज्ञे समाप्ते तु विश्वामित्रो महामुनि: ॥25॥

मुनि पूजिति रामास जसे इंद्रास पूर्विही
समाप्त होता यज्ञ विश्वामित्र महामुनी ॥25॥

निरीतिका दिशो दृष्ट्वा काकुत्समिदमब्रवीत ।
कृतार्थोऽस्मि महाबाहो कृतं गुरुवचस्त्वथा ॥26॥

म्हणती पाहुनी सर्व पीडा रहित ते स्थल ।
जागुनी गुरु वचना तू कृतार्थ करिसी मला ॥26॥

सिद्धाश्रममिदं सत्यं कृतं वीर महायशः ।
स हि रामं प्रशस्यैव ताभ्यां संध्यामुपागतम् ॥27॥

सिद्धाश्रम हे नाव सार्थ वीरा महायशा ।
केलेस प्रशंसा करती संध्याकालहि होतसे ॥27॥

**इत्यर्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे त्रिंशः सर्गः॥**

# बालकाण्ड सर्ग 31

अथ तां रजनीं तत्र कृतार्थौ रामलक्ष्मणौ ।
ऊषतुर्मुदितौ वीरौ प्रहृष्टेनान्तरात्मना ॥1॥

घालवूनी तिथे रात्र कृतार्थ रामलक्ष्मण ।
उष:कालात आनंदे वीर अंत:करणि ते ॥1॥

प्रभातायां तु शर्वर्यांकृतपौर्वाह्णिकक्रियौ ।
विश्वामित्रमृषींश्चान्यान्सहितावभिजग्मतु: ॥2॥

प्रभातकाली आन्हीकां स्नानसंध्या आटोपूनी।
जाती समीप भेटाया ऋषीना विश्वामित्रांसह ॥2॥

अभिवाद्य मुनिश्रेष्ठं ज्वलन्तमिव पावकम् ।
ऊचतु: परमोदारं वाक्यं मधुरभाषिणौ ॥3॥

अग्नीपरि तेजस्वी मुनिश्रेष्ठांस वन्दुनी ।
दोघे उदात्त वाणीने वाक्या मधुर बोलले ॥3॥

इमौ स्म मुनिशार्दूल किंकरौ समुपागतौ ।
आज्ञापय मुनिश्रेष्ठ शासनं कवाव किम् ॥4॥

मुनी किंकर हे आम्ही येउनी आपणाकडे ।
विचारत आहे आज्ञा आता काय करायचे ॥4॥

एवमुक्ते तयोर्वाक्ये सर्व एव महर्षय: ।
विश्वामित्रं पुरस्कृत्य रामं वचनमब्रुवन् ॥5॥

वचना ऐकुनिया त्यांच्या महर्षि सर्व जाउनी ।
विश्वामित्रांसवे रामा बोलती वचना असे ॥5॥

मैथिलस्य नरश्रेष्ठ जनकस्य भविष्यति ।
यज्ञ: परमधर्मिष्ठ्स्तत्र यास्यामहे वयम् ॥6॥

मैथिलीत नरश्रेष्ठ करणार जनकनृप ।
धर्मयुक्त महायज्ञ जायचे तिकडे आहे ॥6॥

त्वं चैव नरशार्दूल सहास्माभिर्गमिष्यसि ।
अद्भुतं च धनूरत्नं तत्र त्वं द्रष्टुमर्हसि ॥7॥

तूही नरशार्दूला आमच्यासह येशिल ।
अद्भुत धनुष्य तेथ पाहण्या तुजला मिळे ॥7॥

तद्धि पूर्वं नरश्रेष्ठ दत्तं सदसि दैवतैः ।
अप्रमेयबलं घोरं मखे परमभास्वरम् ॥8॥

नरश्रेष्ठ असे पूर्वी , मिथिलाधिपती तया
अतिप्रबल दिले हे धनु देवे यज्ञमंडपी ॥8॥

नास्य देवा न गन्धर्वा नासुरा न च राक्षसा: ।
कर्तुमारोपणं शक्ता न कथंचन मानुषा: ॥9॥

त्या धनूवरि प्रत्यंचा देव गन्धर्व राक्षस ।
किंवा मानव यापैकी कोणी न चढवू शके ॥9॥

धनुषस्तस्य वीर्यं हि जिज्ञासन्तो महीक्षित: ।
न शंकुरारोपयितुं राजपुत्रा महाबला: ॥10॥

जाणण्या सामर्थ्य त्याचे राजपुत्र, महाबल।
प्रयत्न करण्या आले गेले व्यर्थ तसेचही ॥10॥

तद्धनुर्नरशार्दूल मैथिलस्य महात्मन:।
तत्र द्रक्षसि काकुत्स्थ यज्ञं च परमाद्भुतं ॥11॥

महात्मा मैथिलाचे ते धनुष्य नरशार्दूला ।
तसा अद्भुत तो यज्ञ पहाण्यास मिळे तुला ॥11॥

तद्धि यज्ञफलं तेन मैथिलेनोत्तम धनु: ।
याचितं नरशार्दूल सुनामं सर्वदैवतै: ॥12॥

यज्ञी प्रसन्न देवांना मागे मिथिलाधिश ।
धनु यज्ञफला देती शिवासह सर्व देव त्या ॥12॥

आयागभूतं नृपतेस्तस्य वेश्मनि राघव ।
अर्चितं विविधैर्गन्धैर्धूपैश्चागुरुगन्धिभि: ॥13॥

यज्ञदेवतास्थानी राजगृहि धनु ते असे ।
पूजन तयाचे होते नाना गंधे धुपांसवे ॥13॥

एवमुक्त्वा मुनिवर: प्रस्थानमकरोत्तदा ।
सर्षिसंघ:स काकुत्स्थ: आमन्त्र्य वनदेवता: ॥14॥

मुनिवर्य बोलूनी ऐसे बंधुद्वय ऋषींसवे ।
निरोप वनदेवतांचा घेऊनि निघती पुढे ॥14॥

स्वस्ति वोऽस्तु गमिष्यामि सिद्ध: सिद्धाश्रमादहम् ।
उत्तरे जान्हवीतीरे हिमवन्तं शिलोच्चयं ॥15॥

कल्याण असो तुमचे मनोरथ सिद्ध येथिल ।
उत्तरेस जान्हवीच्या हिमालयि जात मी ॥15॥

इत्युक्त्वा मुनिशार्दूल: कौशिक: स तपोधन: ।
उत्तरां दिशमुद्दिश्य प्रस्थातुमुपचक्रमे ॥16॥

बोलून मुनिशार्दूल विश्वामित्र तपोधन ।
उत्तर दिशेस जाण्या करिती प्रारंभ तेथुनी ॥16॥

तं व्रजंतं मुनिवरमन्वगादनुसारिणाम् ।
शकटी शतमात्रं तु प्रयाणे ब्रह्मवादिनाम् ॥17॥

तैसे मुनिवर जाता अनुसारत मागुनी ।
अनुयायी ब्रह्मवादी शकटी शत बैसुनी ॥17॥

मृगपक्षिगणाश्चैव सिद्धाश्रमनिवासिनः ।
अनुजग्मुर्महात्मानो विश्वामित्रं तपोधनम् ।

निवर्तयामास ततः सर्षिसंघः स पक्षिण : ॥18॥

निघती मृग,पक्षीही सिद्धाश्रमवासि त्यांसवे ।
सिद्धाश्रम मुनींसंगे विश्वामित्रांस मागुती ।
परंतु विश्वामित्र त्यां फिरवी परत जावया ॥18॥

ते गता दूरमध्यानं लम्बमाने दिवाकरे ।
वासं चक्रुर्मुनिगणाः शोणाकूले समाहिताः ॥19॥

बरेच अंतर जाता सूर्यास्त जवळी येता ।
वास्तव्य मुनी करती शोणनदिच्या तिरी ॥19॥

तेऽस्तंगते दिनकरे स्नात्वा हुतहुताशना: ।
विश्वामित्रं पुरस्कृत्य निषेदुरमितौजस: ॥20॥

सूर्य मावळता स्नान करुनी अग्निहोत्रासही ।
अग्रणी विश्वामित्रां तेजस्वी बैसती मुनी ॥20॥

रामोऽपि सहसौमित्रिर्मुनीस्तानभिपूज्य च ।
अग्रतो निषसादाय विश्वामित्रस्य धीमत: ॥21॥

रामही लक्ष्मणासंगे मुनींस अभिदुनी ।
विश्वामित्रांपुढे बैसे बुद्धिमान महामुनी ॥21॥

अथ रामो महातेजा विश्वामित्रं तपोधनम् ।
पप्रच्छ मुनिशार्दूलं कौतूहलसमन्वितम् ॥22॥

राम महातेजस्वी विचारी त्या तपोधना ।
इच्छितो जाणण्या सांगा जर योग्य असेल ते ॥22॥

भगवन्कोऽन्वयं देशः समृद्धवनशोभितः ।
श्रोतुमिच्छामि भद्रं ते वक्तुमर्हसि तत्वतः॥23॥

वनांनी युक्त समृद्ध प्रदेश कोणता असे ।
ऐकण्यास उत्सुक मी कृपया कथना करा ॥23॥

नोदितो रामवाक्येन कथयामास सुव्रत:।
तस्य देशस्य निखिलमृषिमध्ये महातपा: ॥24॥

प्रार्थिता असे त्याने विश्वामित्र तपोधन ।
ऋषी समुदाया संगे देशासंबंधि सांगती ॥24॥

**इत्यर्थे श्रीमद्रामायणे वाल्मिकीय आदिकाव्ये बालकाण्डे एकत्रिंश: सर्ग:।**

# बालकाण्ड सर्ग 32

ब्रह्मयोनिर्महानासीत्कुशो नाम महातप: ।
अक्लिष्टव्रतधर्मज्ञ: सज्जनप्रतिपूजक: ॥1॥

ब्रह्मयोनिमध्ये होता कुश नामकसज्जन ।
धर्मज्ञ,तपोश्रेष्ठ सज्जनांचा पूजक ॥1॥

स महात्मा कुलीनायां युक्तायां सुमहाबलान् ।
वैदर्भ्यो जनयामास चतुर: सदृशान् सुतान् ॥2॥

कुलीन आचरणे शुद्ध त्याच्या कन्येस होत ते ।
पुत्र बलशाली चार करण्या धर्म वर्धन ॥2॥

कुशाम्ब कुशनामं च असूर्तरजसं वसुम् ।
दीप्तियुक्तान्महोत्साहान्क्षत्रधर्मविकीर्षया ॥3॥

कुशाम्ब नि कुशनाम असूर्तरजस अन् वसू ।
ते दीप्तिमान,उत्साही क्षात्रधार्मास पाळण्या ॥3॥

तानुवाच कुश: पुत्रान्धर्मिष्ठान्सत्यवादिन: ।
क्रियतां पालनं पुत्रा धर्मं प्राप्स्यथ पुष्कलम् ॥4॥

बोलला कुश पुत्राना धर्मिष्ठ सत्यवचनि जे ।
प्रजापालन करा तुम्ही पुण्य लाभेल पुष्कळ ॥4॥

कुशस्य वचनं श्रुत्वा चत्वारो लोकसत्तमा: ।
निवेशं चक्रिरे सर्वे पुराणां नृवरास्तदा ॥5॥

कुशाच्या ऐकुनी वचना लोकोत्तर चार पुत्र ते ।
वसविती नगरे चार प्रजापालन व्हावया ॥5॥

कुशाम्बस्तु महातेजा: कौशाम्बीमकरोत्पुरीम् ।
कुशनाभस्तु धर्मात्मा पुरं चक्रे महोदयम् ॥6॥

कुशाम्ब महातेजस्वी कौशाम्बी वसवी पुरी ।
धर्मात्मा कुशनाभाचे महोदय हे पुर ॥6॥

असूर्तरजसो नाम धर्मारण्यं महामतिः ।
चक्रे पुरवरं राजा वसुर्नाम गिरिव्रजम् ॥7॥

धर्मारण्य पुरीवसवी असूर्तरजस नृप ।
पुरवर राजा वसवी पुर नामे गिरिव्रज ॥7॥

एषा वसुमती नाम वसोस्त्यस्य महात्मनः ।
एते शैलवराः पञ्चप्रकाशन्ते समन्ततः ॥8॥

वसुमती नगरी तीच महात्मा वसुराजाची ।
जिच्याभंवती पाच श्रेष्ठ पर्वत शोभती ॥8॥

सुमागधी नदी रम्या मागधान्‍ विश्रुताऽऽययौ ।
पंचानां शैलमुख्यानां मध्ये मालेव शोभते ॥9॥

सुमागधी नदी रम्य वाहते मगधातुनी ।
पंच पर्वतरांगेत मालिकेपरि शोभते ॥9॥

सैषा हि मागधी राम वसोस्तस्य महात्मनः ।
पूर्वाभिचरिता राम सुक्षेत्रा सस्यमालिनी ॥10॥

तशी सुमागधी नामे प्रसिद्ध वाहते नदी ।
रामा मगध देशात सुपीक प्रदेशा करी ॥10॥

कुशनाभस्तु राजर्षि: कन्याशतमनुत्तमम् ।
जनयामास धर्मात्मा घृताच्यां रघुनन्दन ॥11॥
तास्तु यौवनशालिन्यौ रूपवत्य: स्वलंकृता: ।
उद्यानभूमिमागम्य प्रावृषीव शतहृदा: ॥12॥

धर्मात्मा कुशनाभाला कन्या शंभर उत्तम ।
घृताची अप्सरा माता असे त्या रघुनन्दन ॥11॥

सर्व त्या यौवनशाली रूपवान अलंकृता ॥
उद्यानभूमिवरि येत आनंदात निमग्न त्या ॥12॥

गायन्त्यो नृत्यमानाश्च वादयन्यस्तु राघव ।
आमोदं परमं जग्मुर्वराभरणभूषिता :॥13॥
अथ ताश्चारुसर्वाङ्ग्यो रूपेणाप्रतिमा भुवि ।
उद्यानभूमिमागम्य तारा इव घनान्तरे ॥14॥
ता: सर्वा: गुणसंपन्ना: रूपयौवनसंयुता: ।
दृष्ट्वा सर्वात्मको वायुरिदं वचनमब्रवीत ॥15॥

अहं व: कामये सर्वा भार्या मम भविष्यथ ।
मानुषस्त्यजतां भावो दीर्घमायुरवाप्स्यथ ॥16॥
चलं हि यौवनं नित्यं मानुषेषु विषेशत: ।
अक्षयं यौवनं प्राप्ता अमर्यश्च भविष्यथ ॥17॥

एकदा उपवनी जाती आभरणे अलंकृत ।
करती गायन नृत्यास वादनहि ते तसे ॥13॥
निमग्न परमानंदी त्या रूपयौवन सुंदरा ।
जश्या पर्जन्यकाळी मेघातुन विद्युल्लता ॥14॥

त्या सर्व गुणसंपन्ना रूपयौवन युक्तश्या ।
वायू पाहुनिया त्यांना ऐसे वचन बोलला ॥15॥
तुम्हावरी मन माझे जातसे इच्छितो असे ।
भार्या व्हा सगळ्या माझ्या त्यागुनी योनि मानव ॥16॥
मनुष्ययोनीत तुम्हा तारुण्य मर्यादित ।
अक्षय उपभोगाल तारुण्य अमरत्वासही ॥17॥

तस्य तद्वचनं श्रुत्वा वायोरक्लिष्टकर्मण:।
अपहास्य ततो वाक्यं कन्याशतमथा ब्रवीत ॥18॥

ऐकुनी बोला त्याच्या महापराक्रमि जो असे ।
उपहासे शतकन्या सर्व त्या बोलल्या असे ॥18॥

अन्तश्चरसि भूतानां सर्वेषां सुरसत्तम ।
प्रभावज्ञाश्च ते सर्वा: किमर्थमवमन्यसे ॥19॥

जाणतो हे सुरश्रेष्ठा संचरसि सर्व या जगी ।
तव प्रभाव आम्हा ज्ञात अवमानिसि का आम्हा ॥19॥

कुशनाभसुता देव समस्ता: सुरसत्तम ।
स्थानाच्च्यावयितुं देवं रक्षामस्तु तपो वयम ॥20॥

कन्या कुशनाभाच्या सुरश्रेष्ठा आम्ही आहो ।
आमचे रक्षण करण्या जरि आम्ही समर्थही ।
रक्षण्या आमुचे तप ते करणे नच शक्य ते ॥20॥

मा भूत्स काले दुर्मेध: पितरं सत्यवादिनं ।
अवमन्य स्वधर्मेण स्वयंवरमुपास्महे ॥21॥

पित्याचा तरि दुर्बुद्धे अवमान करूनिया ।
स्वयंवर करण्याचा आम्हावरि न काळ ये ॥21॥

पिताहि प्रभुरस्माकं दैवतं परमं च स: ।

यस्य नो दास्यति पिता स नो भर्ता भविष्यति ॥22॥

पिताच स्वामी आमुचा परम दैवतही आम्हा ।
ते देतिल ज्याला तो आमचा पति होइल ॥22॥

तासां तु वचनं श्रुत्वा हरिः परमकोपनः ।
प्रविश्य सर्वगात्राणि बभंज भगवान्प्रभुः ॥23॥

ऐकुनी वचना त्यांच्या वायु अतिक्रुद्ध होतसे ।
गात्रांत प्रवेशी त्यांच्या कुबड्या करि तो तया ॥23॥

ताः कन्याः वायुना भाग्नाः विविशुर्नृपतेर्गृहम् ।

अविश्य च सुसभ्रान्ता: सलज्जा: सास्रलोचना: ||24||

अंतर्भंग अश्या झाल्या नृपगृहे प्रवेशती ।
दु:खिता साश्रुनयना लज्जिता भ्रमिष्ट त्या ||24||

स च ता दयिता भग्ना: कन्या: परमशोभना:।
दृष्ट्वा दीनास्तथा राजा संभ्रान्त इदमब्रवीत ||25||

अश्या भग्न अन दीन कन्यांना अवलोकुनी ।
भ्रान्त होउनिया राजा विचारी सुन्दरींस त्या ||25||

किमिदं कथ्यतां पुत्र्य: को धर्ममवमन्यते ।

कुब्जा: केन कृता: सर्वाश्चेष्टन्त्यो नाभिभाषथ ॥26॥
एवं राजा विनि:श्वस्य समाधिं संदधे तत: ॥27॥
मुलींनो काय ते सांगा अतिक्रमे कोण धर्म तो ।

केले तुम्हा कुणी ऐसे कुब्जा का आक्रंदता ॥26॥
सुस्कारुनी दु:खाने तो राजा एकाग्र ऐकण्या ॥27॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे द्वात्रिंशं सर्ग:।**

# बालकाण्ड सर्ग 33

तस्य तद्वचनं श्रुत्वा कुशनामस्य धीमत:।
शिरोभिश्चरणौ स्पृष्ट्वा कन्याशतमभाषत ॥1॥
वायु: सर्वात्मको राजन्प्रधर्षयितुमिच्छति ।
अशुभं मार्गमास्थाय न धर्मं प्रत्यवेक्षते ॥2॥

पिता कुशनाम विचारी ते ऐकुनी शतकन्यका ।
चरणी शिर ठेवूनी सांगती सर्व धीमता ॥1॥

क सर्वात्मक वायु पापमार्गावलंबन ।
बलात्कार करू पाहे धर्मास अवहेलुनी ॥2॥

पितृमत्य: स्म भद्रं ते स्वच्छन्देन वयं स्थिता:।
पितरं नो वृणीष्व श्वं यदि नो दास्यते तव ॥3॥

तयाला सांगता आम्ही पित्याच्या आज्ञेत राहतो ।
तयाने दिधले असता करू तू सांगतो तसे ॥3॥

तेन पापानुबन्धेन वचनं न प्रतीच्छता ।
एवं ब्रुवन्त: सर्वा: स्म वायुनाभिहता भृशम् ॥4॥

वायूने पापबुद्धी त्या आमचे काही न ऐकता ।
आमच्यावरि शक्तीने घाला घालतसे तदा ॥4॥

तासां तु वचनं श्रुत्वा राजा परमधार्मिकः।
प्रत्युवाच महातेजाः कन्याशतमनुत्तमम् ॥5॥

त्यांच्या वचना ऐकून राजा धार्मिक जो असे ।
आपल्या शत उत्कृष्ट कन्यांना बोलतो तयां ॥5॥

क्षान्तम् क्षमावतां पुत्र्यः कर्तव्यं सुमहत्कृतम् ।
ऐकमत्यमुपागम्य कुलं चावेक्षितं मम ॥6॥

क्षमा एकमते केली चांगले कर्तव्य जाहले ।
तसे कुलाच्या आपुल्या जपले ब्रीदास उत्तम ॥6॥

अलंकारो हि नारीणां क्षमा तु पुरुषस्य वा ।
दुष्करं तच्च वै क्षान्तं त्रिदशेषु विशेषत: ॥7॥

क्षमा भूषण नारींना तसेच पुरुषांसही ।
देवांनाहि तुम्ही केली असे हे तर दुष्कर ॥7॥

यादृशी वा क्षमा पुत्र्य: सर्वासामविशेषत: ।
क्षमा दानं क्षमा सत्यं क्षमा यज्ञाश्च पुत्रिका: ॥8॥

क्षमा यशः क्षमा धर्मः क्षमायां तिष्ठितं जगत ।

जैसी क्षमा तुम्हाठायी तशी सर्वांकडे असो।
सत्य दान यश धर्म अंतर्भूत क्षमेतच ॥8॥
कन्यांनो तिष्ठित आहे जग सर्व क्षमेमध्ये ।

विसृज्य कन्याः काकुत्स्थ राजा त्रिदशविक्रमः॥9॥
मन्त्रज्ञो मन्त्रयामास प्रदानं सह मन्त्रिभिः ।
देशे काले च कर्तव्यं सदृषे प्रतिपादनम् ॥10॥

ऐसे बोलुनि कन्यांना राजा त्रिदशविक्रम ॥९॥

मन्त्र्यांसमवेत त्याच्या चर्चा करण्या जातसे ।
विवाहास्तव कन्यांच्या योग्य काळी,स्थळी तसे॥10॥

एतस्मिन्नेव काले तु चूली नाम महाद्युतिः ।
ऊर्ध्वरेताः शुभाचारो ब्राह्मं तप उपागताम् ॥11॥

याच काळामध्ये चूली या नावाचा महामुनी ।
ब्रह्मप्राप्तीस्तव तप ब्रह्मचारी करीतसे ॥11॥

तपस्यन्तमृषिं तत्र गन्धर्वी पर्युपासते ।
सोमदा नाम भद्रं ते उर्मिलातनया तदा ॥12॥

तप मुनी करताना सेवा त्याची करीतसे ।
सोमदा नाम गन्धर्वी मातेचे नाम उर्मिला ॥12॥

सा च तं प्रणता भूता शुश्रूषण परायणा ।
उवास काले धर्मिष्ठा तस्यास्तुष्टोऽभवद्गुरु: ॥13॥

भक्तीयुकत मनाने ती त्याची सेवा करीतसे ।
राहता धर्माचरणे चूली तुष्ट तिच्यावरी ॥13॥

स च तां कालयोगेन प्रोवाच रघुनन्दन।
परितुष्टोऽस्मि भद्रं ते किं करोमि तव प्रियम् ॥14॥

गेल्यावर काही काळ रामा विचारी तो तिला ।
संतुष्ट तुजवरी मी काय कल्याण तव करू ॥14॥

परितुष्ट्म मुनिं ज्ञात्वा गन्धर्वी मधुर स्वरम् ।
उवाच परमप्रीता वाक्यज्ञा वाक्यकोविदं ॥15॥

जाणून मुनि संतुष्ट गन्धर्वी मधुर स्वरे ।
म्हणे परम भक्तीने मुनीना वाक्यकोविद ॥15॥

लक्ष्म्या समुदितो ब्राह्म्या ब्रह्मभूतो महातपा: ।
ब्राह्मेण तपसा युक्तम् पुत्रम् इच्छामि धार्मिक ॥16॥

तपाने लक्ष्मि समृद्ध ब्रह्मभूत महातप ।
इच्छा मज असे व्हावा ब्रह्मज्ञपुत्र धार्मिक ॥16॥

अपति: च अस्मि भद्रम् ते भार्या न अस्मि कस्यचित ।
ब्राह्मेण उपगताया: च दातुम् अर्हसि मे सुतम् ॥17॥

अविवाहित मी आहे कोणाची पत्नि ना असे ।
ब्रह्मयुक्त असा पुत्र द्यावा मज आपण ॥17॥

तस्या: प्रसन्नो ब्रह्मर्षि: ददौ ब्राह्मण अनुत्तमम् ।
ब्रह्मदत्त इति ख्यातम् मानसम् चूलिन: सुतम् ॥18॥

तिच्यावरती संतुष्ट तिज देई तसा सुत ।
ब्रह्मदत्त नावे ख्यात चूलीमानसपुत्र तो ॥18॥

स राजा ब्रह्मदत्त: तु पुरीम् अध्यवसत तदा ।
कांपिल्याम् परया लक्ष्यां देवराजो यथा दिवम् ॥19॥

ब्रह्मदत्त पुढे राजा कांपिल्या राहुनी पुरी ।
करी राज्य जसा इंद्र स्वर्गात करीतसे ॥19॥

स बुद्धिम् कृतवान् राजा कुशनाभ: सुधार्मिक:।
ब्रह्मदत्तय काकुत्स्थ दातुम् कन्या शतम् तदा ॥20॥

राजा धार्मिक कुशनाभ,विचार देण्याचा करी।
ब्रह्मदत्तास काकुत्स्था, शत कन्यांस आपुल्या ॥20॥

तम् आहूय महातेजा ब्रह्मदत्तम् महीपतिः ।
ददौ कन्या शतम् राजा सुप्रीतेन अंतरात्मना ॥21॥

आमन्त्रून महातेज ब्रह्मदत्तास तो नृप ।
आनंदित मने त्याला देत कन्या आपल्या ॥21॥

यथा क्रमम् ततः पाणिम् जग्राह रघुनंदन ।
ब्रह्मदत्तो महीपालः तासाम् देवपतिः यथा ॥22॥

क्रमाने सर्व कन्यांचे पाणिग्रहण करीतसे ।
ब्रह्मदत्त महीपाल देवराज जसा करी ॥22॥

स्पृष्टमात्रे तदा पाणौ विकुब्जा विगतज्वरा: ।
युक्तं परमया लक्ष्म्या बभौ कन्याशतं तदा ॥23॥

स्पर्श होता तया हस्ता कुबडेपण जाउनी ।
अतिशय सौन्दर्याने युक्त त्या दिसु लागल्या ॥23॥

स दृष्ट्वा वायुना मुक्ता: कुशनाभो महीपति: ।
बभूव परमप्रीतो हर्षं लेभे पुन: पुन: ॥24॥

त्या वायुपासून मुक्त त्या स्वकन्यांस पाहुनी ।
आनंदित कुशनाभ करी हर्ष पुन्हा पुन्हा ॥24॥

कृतोद्वहं तु राजानं ब्रह्मदत्तम्‌ महीपतिम्‌ ।
सदारं प्रेषयामास सोपाध्यागणं तथा ॥25॥

विवाहानंतर त्याला सर्व पत्नींसवे तसे ।
उपाध्यायांसमवेत ब्रहमदत्तास पाठवी ॥25॥

सोमदापि सुतं दृष्ट्वा पुत्रस्य सदृषीं क्रियाम्‌ ।
यथान्यायं च गन्धर्वी स्नुषास्ता: प्रत्यनन्दत ॥26॥

स्पृष्ट्वा स्पृष्ट्वा च ताः कन्याः कुशनाभं प्रशस्य च ॥27॥

सोमदा पाहुनी पुत्रा आणि समवेत त्या स्नुषा ।
आपल्या पुत्रास योग्य स्त्रिया असति पाहुनी।२६॥
फिरुनी फिरुनी स्पर्शे कुशनाभा प्रशंसुनी ॥27॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे त्रयस्त्रिंशःसर्गः**

# रामायण बालकाण्ड सर्ग 34

कृतोद्वाहे गते तस्मिन्ब्रह्मदत्ते च राघव ।
अपुत्र: पुत्रलाभाय पौत्रिमिष्टिमकल्पयत ॥१॥

विवाह करुनी जाता ब्रह्मदत्त स्त्रियांसवे ।
पुत्रप्राप्तीस्तव यज्ञ कुशनाभ करीतसे ॥१॥

इष्ट्या तु वर्तमानायां कुशनाभ महीपतिम् ।
उवाच परमोदार: कुशो ब्रह्मसुतस्तदा ॥२॥

कुशनाभ महिपति ची इच्छा पुरविण्यास्तव ।
कुश ब्रह्मसुत त्याला उदार बोलला असे ॥२॥

पुत्रस्ते सदृश: पुत्र भविष्यति सुधार्मिक: ।
गाधिं प्राप्स्यसि तेन त्वं कीर्तिं लोके च शाश्वतीम् ॥३॥

तुझ्यासारखाच पुत्र धार्मिक तुज होइल ।
गाधि नाम तुझी कीर्ती करेल जगि शाश्वत ॥३॥

एवमुक्त्वा कुशो राम कुशनाभं महीपतिम् ।
जगामाकाशमाविश्य ब्रह्मलोकं सनातनम् ॥४॥

एवढे बोलुनि हे रामा कुशनाभा नृपास तो ।
आकाशगामि होऊन जातसे ब्रह्मलोकी तो ॥४॥

कस्यचित्वथ कालस्य कुशनाभस्य धीमत:।
जज्ञे परमधर्मिष्ठो गाधिरित्येव नामत: ॥५॥

जाता नंतर दिन काही कुशनाभास धार्मिक ।
पुत्र ज्या नाम गाधि हे होता परमधार्मिक ॥५॥

स पिता मम काकुत्स्थ गाधि: परमधार्मिक:।
कुशवंशप्रसूतोऽस्मि कौशिको रघुनन्दन ॥६॥

तोच धार्मिक असे गाधि पिता मम रघुनन्दना।
कुशवंशात जन्मोनी मज कौशिक जाणती ॥६॥

पूर्वजा भगिनी चापि मम राघव सुव्रता।
नाम्ना सत्यवती नाम ऋचीके प्रतिपादिता ॥७॥

सुव्रता राघवा ज्येष्ठ भगिनीही मला असे।
सत्यबती तिचे नाम भार्या ती ऋचिका असे ॥७॥

सशरीरा गता स्वर्गं भर्तारमनुवर्तिनी।
कौशिकी परमोदारा प्रवृत्ता च महानदी ॥८॥

अनुसारी सदा भर्त्या सदेह स्वर्गि जातसे ।
परमोदारा तिची होई कौशिकी जी महानदी ॥८॥

दिव्या पुण्योदका रम्या हिमवन्तमुपाश्रिता।
लोकस्य हितकार्यार्थे प्रवृत्ता भगिनी मम ॥९॥

भगिनी दिव्य ती माझी रम्यही पुण्यदायक ।
लोकांच्या हितकार्यार्थ असे प्रवृत्त ती सदा ॥९॥

ततोऽहं हिमवत्पार्श्वे वसामि नियत: सुखम्।
भगिन्यां स्नेहसंयुक्त: कौशिक्यां रघुनन्दन ॥१०॥

तदा हिमालयापाशी सुखाने राहतो सदा ।
भगिनीवरील प्रेमाने रामा कौशिकिपाशि मी ॥१०॥

सा तु सत्यवती पुण्या सत्ये धर्मे प्रतिष्ठिता ।
पतिव्रता महाभागा कौशिकी सरितां वरा ॥११॥

पुण्यवान सत्यवादी ती सत्यधर्मे प्रतिष्ठित ।
कौशिकी सरिता मोठी भाग्यशाली पतिव्रता ।॥११॥

अहं हि नियमाद्राम हित्वा तां समुपागत
सिद्धाश्रमनुप्राप्तः सिद्धोऽस्मि तव तेजसा ॥१२॥

कार्यसिद्धीस्तव आलो तिला सोडुन मी इथे ।
सिद्धाश्रमास येऊन तव तेजे कार्यसिद्ध ते ॥१२॥

एषा राम ममोत्पत्तिः स्वस्य वंशस्य कीर्तिता ।
देशस्य हि महाबाहो यन्मां त्वं परिपृच्छसि ॥१३॥

विचारता मला रामा देश इतिहास मी तुला ।
मम वंशासवे कीर्ती जन्मासवे कथिली मम ॥१३॥

गतोऽर्धरात्रः काकुत्स्थ कथाः कथयतो मम ।
निद्रामभ्येहि भद्रं ते मा भूद्विघ्नोऽध्वनीह नः ॥१४॥

कथा सांगत काकुत्स्था रात्र अर्धी लोटली ।
झोप तू ,यापुढती ना विघ्ने येवो भले तुझे ॥१४॥

निष्पदास्तरव: सर्वे निलीना मृगपक्षिण:।
नैशेन तमसा व्याप्ता दिशश्च रघुनन्दन ॥१५॥

बंद सळसळ पानांची पशुपक्षीहि निद्रित ।
रघुनंदना दिशा सर्व अंधारे व्याप्त जाहल्या ॥१५॥

शनैर्विसृज्यते संध्या नभो नेत्रैरिवामृतम् ।
नक्षत्रतारा गहनं ज्योतिभिरवभासते ॥ १६॥

दोन प्रहर उलटून तारे नक्षत्र यामुळे ।
ज्योतिर्मय नेत्रानी आच्छादित जणू नभ ॥१६॥

उत्तिष्ठते च शीतांशु: शशी लोकतमोनुद: ।
हृदयन्प्राणिनां लोके मनांसि प्रभया त्वया ॥१७॥

चंद्र शीत करयुक्त अंध:कार जगातिल ।
घालवी देइ आल्हाद हृदयांस जनांचिया ॥१७॥

नैशानि सर्वभूतानि प्रचरन्ति ततस्तत: ।
यक्षराक्षससंघाश्च रौद्राश्च पिशिताशना: ॥१८॥

यक्ष निशाचर चोर मांसभक्षक राक्षस ।
संचार करिती प्राणी सर्वत्र इतस्ततः:॥१८॥

एवमुक्त्वा महातेजा विरराम महामुनिः।
साधुसाध्विति ते सर्वे मुनयो: ह्यभ्यपूजनम् ॥१९॥

ऐसे बोलून तेजस्वी थांबती ते महामुनि ।
वहावा करिती सर्व मुनी करुनि पूजन ॥१९॥

कुशिकानामयं वंशो महान्धर्मपर: सदा ।
ब्रह्मोपमा महात्मान: कुशवंश्या नरोत्तमा: ॥२०॥

कुशिका नाम हा वंश महान धर्मपरायण ।
पुरुष सर्वच यातील ब्रह्मोपम महाऋषी ॥२०॥

विशेषेण भवानेव विश्वामित्र महायशः ।
कौशिकीं सतां श्रेष्ठा कुलोद्योतकरीतव ॥२१॥

त्यातही आपण श्रेष्ठ विश्वामित्र महायश ।
नद्यांमध्ये असे श्रेष्ठ कौशिकी कुल उद्धरी ॥२१॥

मुदुतैर्मुनिशार्दूलैः प्रशस्तः कुशिकात्मजः ।
निद्रामुपागमच्छ्रीमानस्तं गत इवांशुमान ॥२२॥

आनंदित प्रशस्तीने मुनींच्या कुशिकात्मज ।
अस्ता जाई जसा सूर्य निद्राधीन महामुनी ॥२२॥

रामोऽपि सह सौनित्रि: किंचिदागतविस्मय: ।
प्रशस्य मुनिशार्दूलं निद्रां समुपसेवते ॥२३॥

लक्ष्मणासह श्रीराम विस्मयचकित होउनी ।
प्रशंसून तया तोही निद्राधीनहि होतसे ॥२३॥

**इत्यर्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे चतुस्त्रिंश: सर्ग: ।**

# श्री रामायण बालकांड सर्ग ३५

उपास्य रात्रिशेषम् तु शोणाकूले महर्षिभि: :।
निशायां सुप्रभातायां विश्वामित्रोऽ भ्यभाषत ।।१।।

काढती रात्र उरलेली तिरी शोणनदीचिया ।
उजाडता विश्वामित्र म्हणती रामलक्ष्मणा ॥१॥

सुप्रभाता निशा राम पूर्वा संध्या प्रवर्तते ।
उत्तिष्ठोत्तिष्ठ भद्रं ते गमनायाभिरोचय ।।२ ।।

पहाट होतसे राम ऊठ पूर्वा उजाडली ।
कल्याण तुझे जाण्या पुढती हो तयार तू ॥2॥

तच्छ्रुत्वा वचनं तस्य कृतपूर्वाह्णिकक्रियः ।
गमनं रोचयामास वाक्यं चेदमुवाच ह ॥3॥

ऐकुनी वचना त्यांच्या स्नानसंध्यादिका करी ।
विचार पुढे जाण्याचा करुनी त्यांना असे वदे ॥3॥

अयं शोणः शुभजलोऽगाधः पुलिनमण्डितः ।
कतरेण पथा ब्रह्मन्संतरिष्यामहे वयम् ॥४॥

पवित्र जले भरलेली ही नदी शोण वाहता ।
कसे तरुनिया जावे तिला पार करुनिया ॥४॥

एवमुक्तस्तु रामेण विश्वामित्रोऽब्रवीदिदम् ।
एष पन्था मयोद्दिष्टो येन यान्ति महर्षय:॥५॥

विचारी राम हे जेव्हां म्हणती विश्वामित्र त्या
महर्षी जाति ज्या मार्गे तोच माझ्या असे मनी॥५॥

ते गत्वा दूरमध्वानं गतेऽर्धदिवसे तदा ।
जाह्नवीं सरितां श्रेष्ठां ददृशुर्मुनिसेविताम् ॥६॥

बरेच अंतर ते जाता अर्धा दिवस लोटला।
मुनींनी सेविली श्रेष्ठ जान्हवी सरिता दिसे ॥६॥

तां दृष्ट्वा पुण्यसलिलां हंससारससेविताम्।
बभूवर्मुनय: सर्वे मुदिता: सहराघवा: ॥७॥

जिच्यात सारस हंस पुण्योदक तिज पाहता।
राघवासवें ते सर्व मुनि हर्षित होउनी ॥७॥

तस्यास्तीरे तदा सर्वे चक्रुर्वासपरिग्रहम्।
तत: स्नात्वा यथान्यायं संतर्प्य पितृदेवता: ॥८॥

सडासम्मार्जनाने ते वास्तव्य योग्य स्थान ते ।
स्नान यथोचित करती पितृदेवां संतर्पुनी ॥८॥

हुत्वा चैवाग्निहोत्राणि प्राश्य चामृतवद्धविः ।
विविशुर्जाह्नवीतीरे शुभामुदित मानसाः ॥९॥

अग्निहोत्र करुनिया स्वादिष्ट अन्न भक्षुनी ।
वसती जान्हवीतीरी प्रसन्न मनि होउनी ॥९॥

विश्वामित्रं महात्मानं परिवार्य समन्ततः ।
विष्ठिताश्च यथान्यायं राघवौ च यथार्हत

संप्रहृष्टमना रामो विश्वामित्रमथाब्रवीत ॥१०॥

विश्वामित्रां सभोती ते योग्यतेनुरूप मुनी ।
तैसे रघुवंशी स्थान योग्य पाहुनी बैसती ।
आनंदित मने राम विश्वामित्रां असे वदे ॥१०॥

भगवत्च्छ्रोतुमिच्छामि गंगां त्रिपथगां नदीम् ॥
त्रैलोक्यं कथमाक्रम्य गता नदन्दीपतिम् ॥११॥

गंगा जी तीन मार्गांनी त्रैलोक्या व्यापुनी कशी ।
सागराप्रति ती जाई इच्छितो जाणण्यास मी ॥११॥

चोदितो रामवाक्येन विश्वामित्रो महामुनिः ।
वृद्धिम जन्म च गंगायाम्‌ वक्तुमेवोपचक्रमे ॥१२॥

वचने प्रेरित होऊनी रामाच्या ते महामुनी ।
उत्पत्ति वृद्धि गंगेची झाले उद्युक्त सांगण्या ॥१२॥

शैलेन्द्र हिमवान्नाम धातूनामाकरो महान्‌ ।
तस्य कन्याद्वयं राम रूपेणाप्रतिमं भुवि ॥१३॥

हिमालय नाम शैलेन्द्र साठा धातूंचा महान ।
असती दोन कन्या त्या रूपे अप्रतिम जगी ॥१३॥

या मेरुदुहिता राम तयोर्माता सुमध्यमा ।
नाम्ना मेना मनोज्ञा वै पत्नी हिमवत: प्रिया ॥१४॥

सुमध्यमा त्यांची माता रामा भार्या गिरीचि त्या ।
तिचे नाम असे मेना हिमगिरीस असे प्रिय ॥१४॥

तस्यां गंगेयमभवज्ज्येष्ठा हिमवत: सुता:
उमा नाम द्वितीयाभूत्कन्या तस्यैव राघव॥१५॥

गंगा तयातील ज्येष्ठ हिमालय कन्यकांमध्ये ।
राघवा त्याची दुसरी कन्या नाम उमा तिचे ॥१५॥

अथ ज्येष्ठां सुरा: सर्वे देवकार्यचिकिर्षया ।
शैलेन्द्रं वरयामासुर्गंगां त्रिपथगा नदीम् ॥१६॥

देवकार्य सिद्धीस्तव सर्व सुर ज्येष्ठ तदा ।
शैलेन्द्रा तीन मार्गांनी जाणाऱ्या गंगेस मागती ॥१६॥

ददौ धर्मेण हिमवान्स्तनयां लोकपावनीम् ॥
स्वच्छन्दपथगां गङ्गां त्रैलोक्यहितकाम्यया ॥१७॥

धर्मकार्यास्तव देई तिला देवां हिमालय ।
स्वेच्छेने धावणारी ती जगत्पावन जी करी ॥१७॥

प्रतिगृह्य त्रिलोकार्थं त्रिलोकहितकांक्षिण:।
गङ्गामादाय तेऽगच्छन्कृतार्थेनान्तरात्मना॥१८॥

त्रैलोक्यहित इच्छेने स्वीकारून तया सुर ।
कृतकृत्य होत्साते जाती स्वर्गात घेउन ॥१८॥

या चान्या शैलदुहिता कन्यासीद्रघुनन्दन ।
उग्रंसुव्रतमास्थाय तपस्तेते तपोधना ॥१९॥

पर्वताची दुसरी कन्या तपस्वी रघुनंदना ।
पाळुनी नियमा उग्र तपश्चर्या करीतसे ॥१९॥

उग्रेण तपसा युक्तां ददौ शैलवर: सुताम्।
रुद्रायामप्रतिरूपाय उमां लोकनमस्कृताम्॥॥।२०॥

त्या तपस्वी कन्येस उमा नाव जिचे असे।
हिमालय तिजला अर्पी रुद्राला वंद्य ती जगी॥२०॥

एते ते शैलराजस्य सुते लोकनमस्कृते।
गङ्गां च सरितां श्रेष्ठां उमादेवी च राघव॥२१॥

अश्या पर्वतराजाच्या लोकवंद्य द्विकन्यका।
गंगा हि सरिता श्रेष्ठ उमा ही राघवा तशी॥२१॥

एतेत्ते सर्वमाख्यातं यथा त्रिपथगामिनी ।
सां गता प्रथमं तात गतिं गतिमतां वर
सुरलोकं समारूढा विपापा जलवाहिनी ॥२२॥

कथिले तुज मी रामा पर्वत कन्या या अश्या ।
आकाशमार्गे गंगा विपापा जलवाहिनी ।
जातसे देवलोकीं ती म्हणुनी त्रिपथगामिनी ॥२२॥

**इत्यार्थे शीमद्रामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे पंचत्रिंशः सर्गः ॥**

# बालकाण्ड सर्ग 36

उक्तवाक्येमुनौ तस्मिन्नुभौ राघवलक्ष्मणौ ।
प्रतिनन्द्य कथां वीरावूचतुर्मुनिपुङ्गवम् ॥1॥

मुनींचे ऐकूनी बोल दोघे ते राम लक्ष्मण ।
प्रशंसून कथा दोघे त्यांना म्हणती असे ॥1॥

धर्मयुक्तमिदं ब्रह्मन्कथितं परमं त्वया ।
दुहितुः शैलराजस्य ज्येष्ठाया वक्तुमर्हसि ।

विस्तरं विस्तरज्ञोऽसि दिव्यं मानुषसंभवम् ॥2॥
त्रीन्पथो हेतुना केन प्लावयेल्लोकपावनी

आम्हा सांगितले ब्रह्मन् धर्मयुक्त कथा अशी ।
द्वितीय शैलराजाच्या कन्येचेहि आपण ॥2॥
जाणता सविस्तर सांगा ज्ञात जे आपणा असे
हेतूने कोणत्या गेली त्रिपथी लोकपावनी ।

कथं गङ्गा त्रिपथगा विश्रुता सरिदुत्तमा ॥3॥
त्रिषु लोकेषु धर्मज्ञ कर्मभिः कैः समन्विता

लोकपावन गंगा का प्रसिद्ध त्रिपथगा अशी ||3||
तिन्ही लोकात धर्मज्ञा कार्य काय करीतसे |

तथा ब्रुवति काकुत्स्थे विश्वामित्रस्तपोधन:||4||
निखिलेन कथां सर्वामृषिमध्ये न्यवेदयत |

रामाने वदता ऐसे विश्वामित्र तपोधन ||4||
कथा पूर्णपणे सर्वा ऋषींसह सांगती |

पुरा राम कृतोद्वाह: शितिकण्ठो महातपा: ||5||
दृष्ट्वा च भगवान्देवीं मैथुनायोपचक्रमे |

पूर्वी रामा महादेव देवीसह तपोनिधी ||5||
घेउनी जवळी करती आरंभ रतिक्रीडेस

तस्य संक्रीडमानस्य महादेवस्य धीमत:
शितिकंठस्य देवस्य दिव्यं वर्षशतम् गतम् ||6||

महादेव उमादेवी क्रीडा चाले अखंडित
लोटली शत वर्षे ती क्रीडा न संपते ||6||

न चापि तनयो राम तस्यामासीत परंतप |
सर्वे देवा: समुद्युक्ता: पितामहपुरोगमा: ||7||

परी परंतप रामा त्यांना पुत्र न संभवे
निवृत्त करण्या त्यांना पाहती सर्व देव ते ||7||

यदिहोत्पद्यते भूतं कस्तत् प्रतिसहिष्यति |
अभिगम्य सुरा: सर्वे प्रणिपत्येदमब्रुवत् ||8||

क्रीडेतुनी या जन्मे जो कोण त्या तेजा सहे |
या शंकेने सर्व देव जाउनि त्याप्रति बोलती ||8||

देवदेव महादेव लोकस्यास्य हिते रत: ।
सुराणां प्रतिपातेन प्रसादं कर्तुमर्हसि ।।9।।

देवदेव महादेवा लोकहितरत आपण ।
वंदितो आपणा आम्हावरी कृपा करा ॥9॥

न लोका धारयिष्यन्ति तव तेज: सुरोत्तम ।
ब्राह्मण तपसा युक्तो देव्या सह तपश्चर ॥10॥

तेजास आपल्या देवा करण्या लोका धारण ।
शक्य ना म्हणुनी देवी सह आपण तप करा ||10||

त्रैलोक्यहितकामार्थ तेहस्तेजसि धारय ।
रक्ष सर्वानिमाल्लोकान् नालोकं कर्तुमर्हसि ॥11॥

त्रैलोक्य हितासाठी स्वतेजा धारुनी तुम्ही ।
विनाश टाळुनि लोकांचा करा रक्षण आमुचे ॥11॥

देवतानां वचः श्रुत्वा सर्वलोकमहेश्वरः ।
बाढमीत्यब्रवीत सर्वान् पुनश्चेदमुवाच ह ॥12॥

ऐकुनी वचना त्यांच्या म्हणती लोकमहेश्वर।
"योग्य हे" पण त्यावरती पुढे त्यां वदती असे ॥12॥

धारयिष्याम्यहं तेजस्तेजसैव सहोमया ।
त्रिदशाः पृथिवी चैव निर्वाणम्धिगच्छतु ॥13॥

उमेसह करतो मी तेजाने तेज धारण ।
ज्यामुळे पृथ्वीवरती नांदे शान्ति जनांप्रति ॥13॥

यदिदं क्षुभितं स्थानान्मम तेजो ह्यनुत्तमम् ।
धारयिष्यति कस्तन्मे ब्रुवन्तु सुरसत्तमा: ॥14॥

परंतु तेज हे माझे स्खलित क्षुब्ध होउनी ।
पडेल तर ते कोण धारण्या शक्य हे वदा ॥14॥

एवमुक्तास्ततो देवा: प्रत्यूचुर्वृषभध्वजम् ।
यत्तेज: क्षुभितं ह्यद्य तद्धरा धारयिष्यति ॥15॥

बोल ऐकुनिया त्यांचे म्हणती वृषभध्वजा ।
क्षुब्ध स्खलित जे तेज करिल धारण ते धरा ॥15॥

एवमुक्त: सुरपति: प्रमुमोच महाबलि:।
तेजसा पृथिवीं येन व्याप्ता सगरिकानना ॥16॥

ऐकूनि वच देवांचे स्वतेजा सोडि शंकर ।
करे पर्वता व्याप्त वनांसह सह सर्व पृथ्विला ॥16॥

ततो देवा: पुनरिदमूचुश्चापि हुताशनम् ।
आविश्य त्वं महातेजो रौद्रं वायुसमन्वित: ॥17॥

तयावरि अग्निदेवा बोलती देव सर्वही ।
येउनी वायुसंगे तू या तेजा करि धारण ॥17॥

तदग्निना पुनर्व्याप्तं संजातं श्वेतपर्वतम् ।
दिव्यं शरवणं चैव पावकादित्यसंनिभम् ॥18॥

तेज ते अग्निने व्याप्त रूप श्वेतपर्वत धारि ते ।
दिव्य वनहि निर्माण अग्निसूर्यसमप्रभ ॥18॥

यत्र जातो महातेजा: कार्तिकेयोऽग्निसंभव: ।
अथोमां च शिवं चैव देवा: सर्विगणास्तथा ॥19॥

पूजयामासुरत्यर्थ सुप्रीतमनस्तदा ।

वनी अग्निजनित त्या जन्मे तेजस्वी महान् ।
कार्तिकेय त्यानंतर ऋषींसह सर्व देव ॥19॥
आनंदे पूजिती देवी उमा नि भगवान शिव ।

अथ शैलसुता राम त्रिदशानिदमब्रवीत ॥20॥
समन्युरशपत सर्वान् क्रोधसंरक्तलोचना ।

रामा यावरि हो क्रुद्ध रक्तवर्ण नेत्रे वदे ॥20॥
उमा समस्त देवांना रोषपूर्वक शाप दे ।

यस्मान्निवारिता चाहं संगता पुत्रकामया ॥21॥
अपत्यं स्वेषु दारेषु नोत्पादयइतुमर्हथ ।
अद्यप्रभृति युष्माकमप्रजा: सन्तु पत्नय:॥22॥

पुत्र व्हावा इच्छेने या केला संग पतींसवे ।
ते घडू न दिले तुम्ही देवांनो तुमच्या स्त्रिया ।22॥
संतानोत्पादन करणे त्यांना शक्य न होइल ।

एवमुक्त्वा सुरान्‍ सर्वान्‍ शशाप पृथिवीमपि ।
अवने नैकरूपा त्वं बहुभार्या भविष्यसि ॥23॥

सुरां शापुनिया ऐसे पृथ्वीसहि शाप देतसे ।
रूप एक न राहील पती होतिल तुज बहू ॥23॥

न च पुत्रकृतां प्रीतिं मत्क्रोधकलुषीकृता।
प्राप्स्यसि त्वं सुदुर्मेधो मम पुत्रमनिच्छती ॥24॥

तुलाही पुत्र होण्याचे सुख क्रोधे मम नच मिळो ।
कारण तू केलिस इच्छा मज पुत्र न व्हावा अशी ॥24॥

तान् सर्वान् पीडितान् दृष्ट्वा सुरान् सुरपतिस्तदा ।
गमनायोपचक्राम दिशं वरुणपालितम् ॥25॥

शापपीडित पाहून देवांना सुरपतीसह ।
भगवान् शंकर झाले करिते प्रस्थान पश्चिमी ॥25॥

स गत्वा तप आतिष्ठत पार्स्वे तस्योत्तरे गिरे ।
हिमवत्प्रभवे श्रृंगे सह देव्या महेश्वर: ॥26॥

उत्तरेस जाऊनी ते उमेसह हिमालयी ।
शिखरे एका बसुनी तप दोघे आरंभती ॥26॥

एष ते विस्तरो राम शैलपुत्र्या निवेदित ।
गंगाया प्रभवं चैव शृणु मे सहलक्ष्मण ॥27॥

शैलकन्या उमेचा मी वृत्तान्त कथिला तुम्हा।
विस्तारे सांगतो आता गंगा प्रादुर्भाव कसा ॥27॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे षट्त्रिंशः सर्गः ॥**

# रामायण बालकान्ड सर्ग 37

तप्यमाने तदा देवे सेंद्रा: साग्निपुरोगमा:।
सेनापतिमभीप्सन्त: पितामहमुपागमम् ॥1॥

चालता तप शिवाचे इंद्र आणि अग्निसवे ।
सेनापतिप्राप्त्यर्थ सर्व देव जाति ब्रह्म्याप्रती ॥1॥

ततोऽब्रुवान् सुरा: सर्वे भगवन्तं पितामहम् ।
प्रणिपत्य सुराराम सेन्द्रा: साग्निपुरोगमा: ॥2॥

तेव्हां म्हणति ते देव ब्रह्मदेवा पितामहा ।
करोनिया नमस्कार रामा अग्नि इन्द्रासवे ॥2॥

येन सेनापतिर्देव दत्तो भगवता पुरा ।
स तपः परमास्थाय तप्यते स्म सहोमया ॥3॥

ज्या शिवे बीजरूपाने सेनापति आम्हा दिला ।
उमादेवीसवे तेच तपा करण्या लागती ॥3॥

यदत्रानन्तरं कार्यं लोकानां हितकाम्यया ।
संविधत्स्व विधानज्ञ त्वं हि नः परमा गतिः ॥4॥

त्यानन्तर लोकांच्या कार्यास हितकारक ।
कराया पूर्ण ते आम्हा पितामह गति आपण ॥4॥

देवतानां वच: श्रुत्वा सर्वलोकपितामह: ।
सान्त्वयन् मधुरैर्वाक्यैस्त्रिदशानिदमब्रवीत ॥5॥

ऐकुनी वच देवांचे सर्व लोक पितामह ।
देण्या धीर तयांना हे स्वरे मधुर बोलती ॥5॥

शैलपुत्र्या यदुक्तं तन्न प्रजा: स्वासु पत्निषु ।
तस्या वचनम्क्लिष्टं सत्यमेव न संशय: ॥6॥

शापाने शैलपुत्रीच्या तुम्हा संतान प्राप्ति ना ।
असत्य न तिचे होणे नि:संशय वचन ते ॥6॥

इयमाकाशगंगा च यस्यां पुत्रं हुताशनः।
जनयिष्यति देवानां सेनापतिमरींदमम् ॥7॥

आकाशगंगा ही जिचा पुत्र हुताशन ।
तीच घालिल जन्मास सेनापति अरिहंतक ॥7॥

ज्येष्ठा शैलेन्द्रदुहिता मानयिष्यति तं सुतम् ।
उमायस्तबहुमतं भविष्यति न संशयः ॥8॥

हिमालय कन्या ज्येष्ठ गंगा त्यासच आपला।
प्रिय पुत्रच मानेल हे मानवेल उमेसही ॥8॥

तच्छ्रुत्वा वचनं तस्य कृतार्था रघुनन्दन ।
प्रणिपत्य सुरा: सर्वे पितामहपूजयन् ॥9॥

वचना ऐकुनी त्याच्या कृतकृत्यही सर्व ते ।
ब्रह्म्यास देव वन्दुनि पूजती रघुनन्दना ॥9॥

ते गत्वा परमं राम कैलासं धातुमन्डितम् ।
अग्निं नियोजयामासु: पुत्रार्थ सर्वदेवता: ॥10॥

अलंकृत जो धातूंनी कैलासाप्रति जाउनी ।
पुत्रनिर्माणकार्यात अग्नीसी देव योजिती ॥10॥

देवकार्यमिदं देव समाधत्स्व हुताशन ।
शैलपुत्र्यां महातेजो गंगायां तेज उत्सृज ॥11॥

हुताशना देवाचे कार्य हे पूर्तता करी ।
रुद्राचे ते महातेज सोड गंगेत शैलजा ॥11॥

देवतानां प्रतिज्ञाय गंगामभ्येथ पावक: ।
गर्भ धारय वै देवि देवतानामिदं प्रियम् ॥12॥

हे ऐकुनी त्यांच्या वचना येवोनी गंगादेवीकडे ।
प्रार्थी धारण्या हा गर्भ देवांचे कार्य देवि ॥12॥

इत्येतद् वचनं श्रुत्वा दिव्यं रूपधारयत ।
स तस्या महिमां दृष्ट्वा समन्तादवशीर्यत ॥13॥

ऐकुनी वचना दिव्य करी धारण रूप ती ।
पाहुनी रूपवैभव ते विखरी तेजा सभोवती ॥13॥

समन्ततस्तदा देविमभ्यषिंचत पावकः।
सर्वस्त्रोतांसि पूर्णानि गंगाया रघुनन्दन ॥14॥

अभिषिक्त करता तेज गंगेभोवति अग्निने ।
रामा सर्व तिचे स्रोत तेजाने परिपूर्ण हो ॥14॥

तमुवाच ततो गङ्गा सर्वदेवपुरोगमम् ।
अशक्ता धारणे देव तेजस्तव समृद्धतम् ॥15॥
दह्यमानाग्नि तेन सम्प्रव्यथितचेतना ।

अग्निदेवासह देवांना म्हणे गंगा समर्थ मी ।
नसे धारण करण्या हे तेज जे स्थापिले तुम्ही ॥15॥
उष्णतेने जळते आहे गात्रे मम व्यथीत ही ।

अथाब्रवीतीदिदं गंगां सर्वदेवहुताशन:||16||
इह हैमवते पार्वे गर्भोऽयं संनिवेश्यताम् ।

देवां हविष्य देणारा अग्नि गंगेस बोलला ॥16॥
स्थाप गर्भास या देवी हिमालय पार्श्वभागि तू

श्रुत्वा त्वग्निवाचो गंगा तं गर्भमतिभास्वरम् ॥17॥
उत्ससर्ज महातेजा:स्रोतोभ्यो हि तदानघ ।

रघुनन्दन निष्पाप अग्नीचे वच ऐकुनी ।
गर्भास अतितेजस्वी योग्य स्थानी ठेवि ती ॥17॥

यदस्या निर्गतं तस्मात तप्तजाम्बूनदप्रभम ॥18॥
कांचनं धरणी प्राप्तंहिरण्यमतुलप्रभम ।
तानं काष्णायसं चैव तैक्ष्ण्यादेवाभिजायत ॥19॥

तप्त जाम्बूनद सोन्यासम तो दिसु लागला॥१८॥
पृथ्वीवर स्थापित जेथे भूमि,वस्तुहि त्या तश्या ।
सुवर्णमय भूभाग ताम्बे लोहात रूपित ॥19॥

मलं तस्याभवत तत्र त्रपु सीसकमेव च ।
तदेतद्धरणीं प्राप्य नानाधातुरवर्धत ॥20॥

रूपान्तरित गर्भाचे शिसे भूमित होतसे ।
नाना धातूंनी समृद्ध पृथ्वी तेथिल होतसे ॥20॥

निक्षिप्तमात्रे गर्भे तु तेजोभिरभिरंजितम् ।
सर्वं पर्वतसंनद्धं सौवर्णमभवद् वनम् ॥21॥

पृथ्वीवर पडता गर्भ तेजाने श्वेतपर्वत ।
वनही तेथिल होत सुवर्णमय झगमगे ॥21॥

जातरूपमिति ख्यातं तदाप्रभृति राघव ।
सुवर्णं पुरुषव्याघ्र हुताशनसमप्रभम् ।

तृणवृक्षलतागुल्मं सर्वं भवति कांचनम् ॥22॥

राघवा पुरुषव्याघ्रा सुवर्ण तेव्हांपासुन ।
प्रसिद्ध जातरूप नामे तदा तेजस्वि होत ते।
तृण,वृक्ष,लता,गुल्म सुवर्णमय होतसे ॥22॥

तं कुमारं ततो जातं सेन्द्रा: सह मरुद्गणा:।
क्षीरसम्भावनार्थाय कृत्तिका: समयोजयन् ॥23॥

तेथ जन्मे कुमारास इन्द्रासह मरुद्गण ।
सांगती कृत्तिकांना ते दुग्धपान करा तया ॥23॥

ताः क्षीरं जातमात्रस्य कृत्वा समयमुत्तमम् ।
ददुः पुत्रोऽयमस्माकं सर्वासामिति निश्चिताः ॥24॥

आमचा पुत्र होईल घालुनी अट ऐसि त्या ।
नवजात अर्भकाला दुग्धपान करीति त्या ॥24॥

ततस्तु देवताः सर्वाः कार्तिकेय इति ब्रुवन् ।
पुत्रस्त्रैलोक्यविख्यातो भविष्यति न संशयः॥25॥

“कार्तिकेय तया नाम”त्यावरी देव बोलती ।
“पुत्र त्रिभुवन कीर्त निःसंशय भविष्य हे” ॥25॥

तेषां तद्वचनं श्रुत्वा स्कन्नं गर्भपरिस्रवे ।
स्नापयन् परया लक्ष्या दीप्यमानं यथानलम् ॥26॥

ऐकुनी वचना गर्भा शिवपार्वति निर्मित ।
सतेज बालका त्या कृत्तिका स्नान घालती ॥26॥

स्कंद इत्यब्रुवन् देवा: स्कन्नं गर्भपरिस्रवे ।
कार्तिकेय महाबाहुं काकुत्स्थ ज्वलनोपमम् ॥27॥

काकुत्स्थभूषण रामा गर्भावस्थेत स्कंदित ।
अग्नीसम तेजस्वी त्या स्कंद ऐसेहि जाणती ॥२७॥

प्रादुर्भूतं ततः क्षीरं कृत्तिकामाननुत्तमम् ।
षण्णाम् षडाननो भूत्वा जग्राह स्तनजं पयः ॥28॥

दुग्ध उत्तम उत्पन्न कृत्तिकाचे सहा मुखे ।
सहाजणींचे सगळ्या स्तनपान करीतसे ॥28॥

गृहीत्वा क्षीरमेकाना सुकुमारवपुस्तदा ।
अजयत स्वेन वीर्येण दैत्यसैन्यगणान् विभुः ॥29॥

एकदाच पिउनी दुग्ध कुमार शक्तिशालि तो ।
स्वबले विजया प्राप्त दैत्यसेनांवरी करी ॥29॥

सुरसेनागणपतिमभ्यषिंचन्महाद्युतिम् ।
तत्स्तममरा: सर्वे समेत्याग्निपुरोगमा: ॥30॥

अग्नीसह सर्वदेव अभिषेका पदावरी ।
सेनापतीस करती स्कंदा तेजस्वी महा ॥30॥

एष ते राम गंगाया विस्तरोऽभिहितो मया ।
कुमारसम्भवश्चैव धन्य: पुण्यस्तथैव च ॥31॥

सविस्तर रामा ऐसे कथिले गंगाचरित्र ते।
कार्तिकेय कसा जन्मे पुण्यप्रद तेहि बोललो ॥31॥

भक्तश्च यः कार्तिकेये काकुत्स्थ भुवि मानवः ।
आयुष्मान् पुत्रपौत्रेश्च स्कन्दसालोक्यतां व्रजेत ॥32॥


काकुत्स्था भक्त स्कंदाचे दीर्घायु होत भूवरी ।
दीर्घायु पुत्रपौत्रासह स्कंदलोकास पावती॥32॥

**इत्यर्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीय आदिकाव्ये बालकाण्डे सप्तत्रिंशः सर्गः॥**


श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची नऊ पुस्तकं.
यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा.








श्याम कुलकर्णी
तुझी माझी जोडी



हास्यरंगी रंगले
श्याम कुलकर्णी


श्याम कुलकर्णी
हसरी वारी
INSURANCE
STAMPING
VISA
IMMIGRATION

वाल्मिकीरामायण- २





मराठी




श्याम कुलकर्णी




मराठी श्लोकानुवाद- श्री श्याम कुलकर्णी
॥ श्रीमद्भगवद्गीता ॥

लवकरच येत आहे.

श्री श्याम कुलकर्णी अनुवादित

मूळ वाल्मिकी रामायण मराठी श्लोकमय तिसरा भाग